बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८९८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३० | बुधवार,दि. ५ जुलै २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# भाजपाने फोडली राष्ट्रवादी



## अजीत पवार उपमुख्यमंत्री,८ जणांचा शपथविधी

**मुंबई:** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडनंतर महाविकास आघाडीला निवडणुकांच्या तोंडावर भाजपाने दुसरा धक्का दिला आहे. राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीतील निष्ठावंतांची फळी फोडण्यात भाजपाने यश मिळविलेले आहे. आधी शिवसेना फोडल्यानंतर आता पुढील निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर भाजपाच्या समृद्धीवर राष्ट्रवादीलाही सोबत घेण्यात पक्ष यशस्वी झाला आहे.

राज्याचे विरोधी पक्षनेते व राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नेते अजित पार यांनी रविवारी सकाळी राष्ट्रवादी कॉँग्रसमध्ये बंडाच झेंडा फ़डकावत अनेक आमदारांसह थेट राजभवन गाठले. या ठिकाणी त्यांनी शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी होत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

### नवनियुक्त मंत्री




अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या ९ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. राजभवनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यपाल रमेश बैस यांनी सर्व मंत्र्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.

वेगाने घडलेल्या या घडामोडीमुळे राज्यातील राजकीय क्षेत्रात जोरदार भुकंप झाला आहे. शिवसेनेनंतर राष्ट्रवादीतदेखील उभी फुट पडल्याचे स्पष्ट झाले आहे.

### बंडखोरांचा पक्षावर दावा

**अतिशय मजबुतीने देशाला पुढे नेण्याच प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. त्यामुळे आपणही त्यांना पाठिंबा दिला पाहिजे. आम्ही शिवसेनेसोबत जाऊ शकतो. तर भाजपासोबतही जाऊ शकतो. बहुतांश नेत्यांन माझा निर्णय मान्य आहे असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शपथविधीनंतर सांगितले. राजकीय पक्ष आणि चिन्ह माझ्याकडे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणूनच सरकारमध्ये सहभागी झालो आहोत. असा दावादेखील त्यांनी केला.**

**शुक्रवारीच विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. केवळ राज्याच्या विकासाचा मुद्दा डोळ्यासमोर ठेवूनच हा निर्णय घेण्यात आला. तसेच केंद्रातील सर्वाधिक निधी राज्याला कसा मिळेल, देशा-तील जनता सुखी कशी राहील यासाठीच हा आम्ही निर्णय घेतला आहे. यापुढील सर्व निवडणूक या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातूनच लढवू. आमच्याबरोबर सर्व आमदार आहेत. आम्ही आगामी निवडणूका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घडयाळ चिन्हावच लढणार.**

**अजित पवार, उपमुख्यमंत्री**

#### डबल इंजिनाला तिसरे इंजिन

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आता मी मुख्यमंत्री आणि सोबत २ उपमुख्यमंत्री आहेत. डबल इंजिनचे सरकार आता ट्रिपल इंजिन बनले आहे. अजित पवारांच्या अनुभवामुळे महाराष्ट्र मजबूत होण्यास मदत होईल, असे शिंदे शपथविधीनंतर म्हणाले. हे नवीन सरकार नाही, शिवसेना आणि भाजप सरकार पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली काम करत आहे. विकासाची कामे सुरु होतील आणि विकास कामावर विश्वास ठेवणाऱ्या अजित पवारांनी सरकारला साथ दिली असे ते म्हणाले.

# अजित पवारांसह ९ आमदार अपात्र ठरलेत, जयंत पाटलांकडून कायदेशीर पाऊल



**मुंबई:** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांनी शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा दिला आहे. पाठिंबा जाहीर केल्यानंतर काही वेळातच अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या इतरही काही नेत्यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. शपथ घेणाऱ्या नेत्यांमध्ये राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, धनंजय मुंडे, सुनील तटकरे यांच्यासह इतरही नेत्यांचा समावेश आहे. या आमदारांविरोधात आता राष्ट्रवादी काँग्रेसने कायदेशीर कारवाईचं पाऊल उचललं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवारांसह शपथ घेणाऱ्या नऊ आमदारांविरोधात अपात्रतेची याचिका दाखल केली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे ही याचिका दाखल करण्यात आली आहे. ईमेल आणि व्हॉट्सॲप मेसेजच्या माध्यमातून ही याचिका दाखल केली आहे, याबाबतची माहिती स्वत: जयंत पाटलांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. यावेळी जयंत पाटील म्हणाले,

### विधानसभा अध्यक्षांकडे अपात्रतेची याचिका पाठवली

**विधानसभा अध्यक्षांच्या ईमेलवर ही याचिका पाठवली आहे. या कागदपत्रांची एक प्रत विधानसभा अध्यक्षांकडे पाठवण्याची व्यवस्था करत आहोत. काही तासात ही प्रत विधानसभा अध्यक्षांना मिळेल. मी स्वत: चारवेळा विधानसभा अध्यक्षांशी संपर्क साधायचा प्रयत्न केला. त्यानंतर व्हॉट्सॲपवरही ही अपात्रतेची याचिका पाठवली आहे. त्याचबरोबर त्यांच्या "आय मेसेज'वरही व्हॉट्सॲपवरील मेसेज लवकरात लवकर पाहावा, अशी विनंती केली आहे. उद्या अपात्रतेच्या याचिकेवर लवकरात लवकर आमची बाजू ऐकून घ्यावी, यासाठी आम्ही राहुल नार्वेकर यांच्याकडे याचिका दाखल केली आहे. ते लवकरात लवकर सुनावणी घेतील, अशी आम्हाला अपेक्षा आहे, असं जयंत पाटलांनी नमूद केलं.**

### भारतीय निवडणूक आयोगालाही कल्पना दिली

**त्याचबरोबर, आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भारतीय निवडणूक आयोगालाही याची कल्पना दिली आहे. नऊ आमदार म्हणजे पाटी होऊ शकत नाही. ज्या नऊ आमदारांनी शपथ घेतली आहे, ती राष्ट्रीय अध्यक्षांना न सांगता केलेली कृती आहे. त्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस तातडीने कायदेशीर पावलं उचलेल, असं मी दुपारी सांगितलं होतं. त्याप्रमाणे मी सर्व पावलं उचलली आहेत. आम्हाला अपेक्षा आहे की, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आम्हाला लवकरात लवकर बोलवावं असंही जयंत पाटील म्हणाले.ज्यावेळी नऊ आमदारांनी पक्षाच्या ध्येय धोरणाविरोधात, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांना आणि प्रदेशाध्यक्षांना कल्पना न देता शपथ घेतली. त्या क्षणापासून ते अपात्र ठरले आहेत. त्याबाबत आम्ही तातडीने पावलं उचलली आहेत. त्यांनी पक्षाच्या धोरण्याच्या विरोधात कृती केली आहे, अशी माहिती जयंत पाटलांनी दिली.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नऊ सदस्यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि प्रदेशाध्यक्ष यांना कोणतीही कल्पना न देता पक्षाच्या धोरणाच्या आणि पक्षाच्या हिताच्या विरोधात राजभवनात जाऊन शपथ घेतली आहे. त्यांची ही कृती पूर्णपणे बेकायदेशीर आहे. महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांना पूर्णपणे अंधारात ठेवून ही कृती करण्यात आली आहे. ही कृती पूर्णपणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे स्टेट डेसिप्लिन कमिटीच्या सल्ल्यानुसार आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अपात्रतेची याचिका विधानसभा अध्यक्षांकडे दाखल करण्यात आली आहे.

# भाजपबरोबर गेलेले चार नेते ईडीच्या चौकशीच्या फेऱ्यात



**मुंबई:** भाजपबरोबर गेलेले प्रफुल्ल पटेल, अजित पवार, छगन भुजबळ आणि हसन मुश्रीफ हे चार नेते ईडीच्या चौकशीच्या फेऱ्यात आहेत. भाजपबरोबर जाण्यात हे महत्त्वाचे कारण असल्याचे बोलले जाते. ईडीचा धाक दाखवून विरोधी पक्षाच्या महत्त्वाच्या नेत्यांना धमकावले जात असल्याचा आरोप करण्यात येतो.

राष्ट्रवादीच्या नेत्यांपैकी छगन भुजबळ यांना अटक झाली होती. प्रफुल्ल पटेल यांचीही चौकशी झाली आहे. अजित पवार यांच्यावर सिंचन घोटाळयाचा आरोप आहे. जरंडेश्वर साखर कारखाना विक्रीत अजितदादांवर टांगती तलवार आहे. प्राप्तिकर विभागाने या प्रकरणात अजितदादांच्या बहिणींच्या घरांवर छापा टाकण्यात आला होता.

हसन मुश्रीफ हे साखर कारखाना घोटाळ्यात अडकले आहेत. त्यांचीही ईडीची चौकशी झाली. मुश्रीफ यांना अटक होणार असे किरीट सोमय्या ठामपणे सांगत होते. भाजपबरोबर गेल्याने चौकशी थंड बस्त्यात जाते हे लक्षात आल्याने भाजपबरोबर जावे असा पक्षातील नेत्यांचा मतप्रवाह होता.

# गरजू लाभार्थ्यांना प्राधान्याने योजनांचा लाभ द्या-खा.अशोक नेते

**गोंदिया :-** केंद्र व राज्य सरकारच्या लोकोपयोगी योजनांची अंमलबजावणी यंत्रणांनी सामाजिक दृष्टीकोन ठेवून कामे करावीत व गरजू लाभार्थ्यांना प्राधान्याने लाभ द्यावे असे निर्देश खासदार अशोक नेते यांनी अंमलबजावणी यंत्रणांना दिले. जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा) बैठक ३ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

सह अध्यक्ष खासदार सु-नील मेंढे, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, आमदार विनोद अग्रवाल, जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष यशवंत गणवीर व प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रमिला जाखलेकर यावेळी उपस्थित होते.

मागील सभेच्या इतिवृत्ताचा अनुपालन अहवाल पुरेशा अवधी पूर्वी सदस्यांना देण्यात यावा अशा सूचना अध्यक्षांनी दिल्या. दिशा समितीमार्फत केंद्र सरकारच्या ३३ पेक्षा अधिक योजना राबविल्या जातात. या योजनांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. केंद्र व राज्य सरकार नागरिकांच्या हिताच्या अनेक योजना राबवित आहे. या योजना लाभार्थ्यांपर्यत पोहोचवण्याची जबाबदारी अंमलबावणी यंत्रणांची आहे असे अध्यक्षांनी सांगितले. केंद्र शासनाच्या योजनांची जिल्हास्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी होते किंवा नाही याबाबत जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीचा आढावा घेणे हा दिशा सभेचा मुख्य उद्देश आहे असे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा यावेळी घेण्यात आला. या योजनेत दिव्यांग व्यक्ती व विधवा महिलांना प्राधान्य देण्यात यावे असे त्यांनी सांगितले. तुडतुडा-मावा रोगाने शेतकऱ्यांचे खुपच नुकसान झालेले आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याकरीता निधीसाठी कृषि विभागाने वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करावा. धानोली ते बाम्हणी रस्त्याच्या कामासाठी ८ दिवसात ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. ज्यांच्याकडे स्वत:च्या मालकीची घरे नाहीत अशा अतिगरजू लोकांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ५०० स्क्वेअर फुट जागा उपलब्ध करुन देवून त्यांना घरकुल मंजूर करण्यात यावे.

शासनाच्या नियमानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास रेती मोफत देण्यात यावी. २०२४ पर्यत कोणीही बिन-घराचा राहता कामा नये असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. त्यामुळे या योजनेस प्रथम प्राधान्य देवून युध्दस्तरावर कामे करण्यात यावी. नवेगावबांध येथील बिडी पत्ता संकलन करणाऱ्या लोकांच्या बँक खात्यात अजुनपर्यत पैसे जमा झालेले नाही, याकडे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांनी स्वत: लक्ष्य देवून सदर प्रकरणाचा निपटारा करण्यात यावा. जिल्ह्यातील काही भागात बीएसएनएल टॉवरची कनेक्टीव्हीटी होत नाही, याबाबत बीएसएनएल विभागाने लक्ष्य देवून कनेक्टीव्हीटीचे काम करुन घ्यावे. जिल्ह्यातील आदिवासी भागात प्राधान्याने विद्युत कनेक्शन देण्यात यावे. गोंदिया जिल्ह्यात पासपोर्ट कार्यालय सुरु करण्याबाबत वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा. बचतगटांनी तयार केलेल्या वस्तुंना संबंधित विभागाने मार्केटिंग उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करावे. पी.एम.किसान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ई-केवायसी करणे आवश्यक आहे. चिरचाळबांध ते दहेगाव रस्त्याचे जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून काम करता येईल यासाठी विशेष बैठक लावण्यात यावी. पांगोली नदीचे पुनरुज्जीवन करण्यात यावे. येडमागोंदी-कडीकसा रस्त्याचे काम प्राधान्याने करण्यात यावे. अशा सूचना त्यांनी यावेळी संबंधित विभागाला दिल्या.

यावेळी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण/शहरी), स्वच्छ भारत मिशन (शहरी/ग्रामीण), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण, दिनदयाल उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना आदिंची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

### दुतर्फा नाल्यांची सफाई आणि बांधकाम करा-नगर विकास आघाडीची मागणी

**सालेकसा:** शहरातून आमगाव ते दरेकसा मुख्य रस्ता जा-तो. या रस्त्याच्या दुतर्फा शहरात ठीक ठिकाणी नाल्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. परंतु पावसाळा सुरू झाले असून सुद्धा सदर नाल्या सफाई करण्यात आली नसल्याने ठीक ठिकाणी पाणी साचून रस्त्या शेजारी तळे साचले असते त्यामुळे नागरिकांना असं या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या नाल्यांची सफाई तात्काळ करण्यात यावी अशी मागणी नगर विकास आघाडी सालेकसाच्या वतीने करण्यात आली. यासंबंधीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग सालेकसा येथील शाखा अभियंता यांना देण्यात आले आहे. याशिवाय एपीजे शाळेसमोर याच मार्गावर गतीवररोधक बांधण्याची सुद्धा मागणी करण्यात आली आहे.

यावेळी नगर विकास आघाडीचे समन्वयक मनोज डोये, विनोद वैद्य, कैलास गजभिये, राहुल हटवार, रोहित बनोठे, गुनीलाल राऊत, प्रकाश टेंभरे, परमानंद शिवणकर, बंडू वाघाडे, महेंद्र कापसे, गोल्डी भाटिया, स्वप्निल करवाडे, उमंग बनसोड व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# रस्ता दुरुस्तीच्या मागणीसाठी कॉँग्रेसचे भजन दिंडी आंदोलन

**सालेकसा:-** तालुक्यातील तिरखेडी-सातगाव मार्गाची अतिशय दुर्दशा झाली आहे. या मार्गावरून ये-जा करणे फारच कठीण झाले आहे. रस्ता दुरुस्तीसाठी प्रशासनाकडे वारंवार विनंती केल्यानंतरही लक्ष देत नसल्याने त्रस्त झालेल्या तिरखेडी-कारुटोला क्षेत्रातील लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी सोमवारी (दि.३) रस्ता रोको आंदोलन आणि भजन, दिंडी काढून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.



सालेकसा तालुक्यातील तिरखेडी-सातगाव मार्गाची दुरुस्ती करण्यात यावी म्हणून आ. सहषराम कोरोटे, जि.प.सदस्या वंदना काळे, जि.प.सदस्या विमल कटरे यांच्यासह रेखा फुंडे व इतर लोकप्रतिनिधींनी जिल्हा बांधकाम विभागाकडे तसेच जिल्हाधिकारी गोतमारे यांच्याकडे पत्रव्यवहार करून रस्ता दुरुस्तीची मागणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागाला याबाबत आदेश दिले; परंतु बांधकाम विभागाने रस्ता दुरुस्तीकडे गांभीर्याने लक्ष न देता टाळाटाळ करण्याचे उत्तर दिले. त्यामुळे रस्ता दुरुस्ती केव्हा होईल हे काही निश्चितपणे सांगता येत नाही.

ही बाब लक्षात घेता तिरखेडी येथील पावर हाऊस चौकात सोमवारी रास्ता रोको आंदोलन करून भजन, दिंडी काढण्यात आली. यात काँग्रेसचे आ. सहषराम कोरोटे हे देखील सहभागी झाले होते. त्यांनी सुध्दा नागरिकांच्या मागणीकडे शासन आणि प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने संताप व्यक्त केला. सालेकसा तालुक्यातील सातगाव या गावातून सातगाव-सालेकसा रस्त्याची दुरावस्था झाली परिणामी या मार्गाची दुरावस्था झाली आहे. परिणामी अपघातांच्या संख्येत वाढ झाली असून याकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यात जि.प.सदस्या छाया नागपुरे, उषा मेंढे, सरपंच प्रिती शरणागत, सरपंच वैभव कावरे, डॉ. संजय देशमुख, संतोष बोहरे, रामेश्वर कटरे, सरपंच गोऱ्हे, बबलू कटरे, गजानन कटरे आदी सहभागी झाले होते.

# देवरी तालुक्यातील सात राईस मिलर्स तीन वर्षाकरिता काळ्या यादीत

**गोंदिया :** तांदूळ नगरी म्हणून ओळखल्या जाणा?या गोंदिया जिल?ह्याच्या देवरी तालुक्यातील सात राईस मिलर्सला तीन वर्षाकरिता काळ्या यादीत टाकण्यात आले.पुढचे तीन वर्ष या सातही राईस मिलर्सला शासकीय धान्याची भरडाई करता येणार नाही. त्यामुळे राईस मिल मालकांमध्ये खळबळ उडाली आहे.गोंदिया जिल्हा मार्केटींग फेडरेशन तसेच आदिवासी विकास महामंळाने गोंदिया जिल?ह्यात खरेदी केलेल्या शासकीय धान्याची भरडाई करते. यासाठी गोंदिया जिल्ह्यातील इतर राईस मिलर्ससह देवरी तालुक्यातील वसंत राईस मिल डोगरगाव, तिरुपती राईस मिल देवरी, महाराष्ट्र एग्रो इंडस्ट्री चिचगड, मा भगवती राईस इंडस्ट्री देवरी, इंडियन फूड प्रॉडक्ट चिचगड, बालाजी राईस मिल बोरगाव बाजार तसेच माँ शक्ती राईस इंडस्ट्री देवरी यांच्याशी धान्य भरडाईचा करार केला होता.



भरडाई केलेला तांदूळ दे-वरी तालुक्यात जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यलयाने भाड्याने घेतलेल्या आशु गोदामात एप्रिल २०२२ मध्ये जमा करण्यात आला होता. त्यावेळी तांदूळ गुणवत्ता अधिकारी म्हणून कार्यरत अस-लेले सतीश अगडे यांनी या सातही राईस मिलर्सने जमा केलेला २७ लॉट तांदळाची गुणवत्ता तपासून तांदूळ जमा केला होता.मात्र ७ मे रोजी आशु गोदामात तांदूळ तपासणीकरिता आलेल्या केंद्रीय पथकाने हा तांदूळ मानवी खाण्यास योग्य नसल्याचे सांगत या तांदळाचे लॉट रद्द करीत सातही राईस मिलर्सला तीन वर्षाकरिता शासकीय धान्याची भरडाई करता धान्य देऊ नये असे निर्देश दिले. म्हणून या राईस मिलला काळ्या यादीत टाकण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकरी चिन्मय गोतमारे यांनी दिली आहे.

दुसरीकडे जिल्हा पुरवठा कार्यलयाने देवरी तालुक्यात एप्रिल २०२२ ला नियुक्त केलेले तांदूळ गुणवत्ता अधिकारी सतीश अगडे यांनी तांदळाची गुणवत्ता तपासून सातही राईस मिलर्सचा तांदूळ गोदामात जमा करून घेतला होता. दुसरीकडे याच तांदळाला केंद्रीय पथकाने मानवी खाण्यास हा तांदूळ योग्य नसल्याचे सांगत कोट्यवधी रुपयांचा २७ लॉट तांदूळ रद्द केला.आणि या सातही राईस मिलर्सकडून नवीन तांदूळ जमा करून घेण्याच्या सूचना जिल्हाधिकर्यांना दिल्या आहेत. त्यामुळे तत्कालीन तांदूळ गुणवत्ता अधिकारी सतीश अगडे यांनी तांदूळ जमा करताना खरंच हा तांदूळ कुठल्या पद्धतीने तपासून घेतला होता. जो आज रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे यांच्या कार्यप्रणालीवर राईस मिलर्सने प्रश्न चिन्ह निर्माण करीत न्यायालयात धाव घेतली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा तांदूळ नगरी म्हणून नाव लौकिक आलेल्या गोंदिया जिल?ह्यात अधिक?ऱ्यांच्या संगनमताने राईस मिलर्स मानवी खाण्यास योग्य नसलेला तांदूळ शासकीय तांदूळ गोदामात जमा करीत असल्याचा केंद्रीय पथकाच्या तपासात उघड आले आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांचे वसतीगृह व स्वाधार योजनेसंदर्भात ओबीसी मंत्री व सचिवांशी चर्चा



**गोंदिया:-** इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत (ओबीसी) इतर मागास प्रवर्ग, भटके विमुक्त आणि विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहे व २१६०० विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना सुरु करण्याच्या मुद्याला घेऊन ४ जुर्ले रोजी ओबीसी बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे व उपसचिव दिनेश चव्हाण यांची भेट घेऊन विदर्भातील ओबीसी संघटनेच्या शिष्टमंडळासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या चर्चेच्यावेळी स्टुडटंस राईटस असो.चे अध्यक्ष उमेश कोराम, ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे, ओबीसी युवा अधिकारमंच, ओबीसी सेवा संघाचे अनिल डहाके व ओबीसी कर्मचारी संघटनेचे एस.यु.वंजारी आदी पदाधिकारी सहभागी झाले होते.

दहावी, बारावीचे निकाल घोषित होवून जवळपास एक महिना उलटला आहे. इतर अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांप्रमाणे ग्रामीण भागा-तील इतर मागास, भटके विमुक्त, विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सुद्धा उच्च शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी यावे लागते. परंतु शहरात वास्तव्याची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना हलाकिचा सामना करावा लागतो आणि अनेक विद्यार्थी गरिबीमुळे शहरात येवूच शकत नाही.



यास्तव इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. ग्रामीण इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृहे व अनुसूचित जातीच्या धर्तीवर स्वाधार योजना ओबीसी विद्यार्थ्यांना लागू व्हावी तसेच वसतीगृह तातडीने सुरु करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी मंत्री सावे यांनी वसतीगृह व स्वाधार योजनेवर काम सुरूअसून प्रस्ताव मागवण्यात आल्याचे सांगितले. येत्या दोन दिवसात यावर बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

## संपादकीय

### चुका मानवी,मग समृद्धी महामार्गालाच दोष का?

शनिवारी नागपूरहून पुण्याला जाणाऱ्या विदर्भ ट्रॅव्हल्सच्या बसला नागपूर–मुंबई बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताने समृद्धी महामार्ग पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. हा महामार्ग ११ डिसेंबर २०२२ रोजी सुरूझाला. आतापर्यंत या मार्गावर ४५० अपघात झाले आहेत, तर १०० च्या आसपास लोकांचा मृत्यू झाला आहे. मात्र असे असले तरी आजही या महामार्गावरून हजारो छोटी–मोठी वाहने सुरक्षित प्रवास करीत आहेत मग काही गाड्यांना अपघात झाला म्हणजे हा संपूर्ण महामार्ग धोकादायक आहे, असे म्हणणे व असा निष्कर्ष काढणे साफ चुकीचे आहे. विशेष म्हणजे महामार्ग बांधत असताना त्याकाळी सत्तेत असलेले सुद्धा आज हा महामार्ग "अपशकुनी' आहे, असे म्हणत आहेत. तेव्हा मात्र त्यांच्या बाळबोध राजकारणाची कीव करावीशी वाटते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रस्ते व महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे संपूर्ण देशामध्ये परदेशाच्या तोडीस तोड असणारे रस्ते बांधत आहेत. कारण चांगल्या रस्त्यांच्या निर्मितीवर देशाची प्रगती होते, हे ते पूर्णपणे जाणून आहेत. त्यामुळे रस्ते बांधणीचे निकष पूर्ण करूनच हे रस्ते बांधले जात आहेत. मात्र मानवी चुकांमुळे होणाऱ्या अपघातांमुळे ते रस्तेच बदनाम करणे हे साफ चुकीचे आहे. समृद्धी महामार्गामुळे नागपूर आणि मुंबई जवळ आणण्याचे महत्त्वाचे काम झाले आहे. थोडक्यात विदर्भापासून मराठवाड्यातील बुलढाणा, वर्धा, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नाशिक, ठाणे, मुंबई या भागाला समृद्धी महामार्गाने समृद्ध केले आहे. मात्र मानवी होणाऱ्या चुकांमुळे समृद्धी महामार्गलाच बदनाम करणे संयुक्त ठरणार नाही.

शनिवारी अपघात घडला, त्याचा अभ्यास पुढे–मागे होईलच. कारणेही अनंत आहेत. मात्र आतापर्यंत जो निष्कर्ष काढण्यात आला आहे की, हा अपघात मानवी चुकांमुळे झाला आहे. शनिवारच्या अपघातामुळे आणखी दोन प्रश्न प्रामुख्याने उपस्थित होतात, खरेच खासगी बस सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य आहेत का? दुसरा मुद्दा एसटी सुरक्षित नसल्यानेच प्रवाशांना नाईलाजाने खासगी बसेसचा पर्याय निवडावा लागतो का? असे बरेच प्रश्न यानिमित्ताने उभे राहतात. सदर खासगी बस ट्रॅव्हल्स नागपूर ते पुणे या मार्गावर धावत होती. या बसच्या चालकाचे झोपेमुळे नियंत्रण सुटले व ती खांबाला धडकून दरवाजाकडील बाजूस पलटी झाली. त्यामुळे सर्व प्रवासी अडकून पडले. जे सुदैवी होते, ते बाहेर आले. मात्र काहीजण बसच्या अंतर्गत रचनेमुळे अडकून पडले त्यांचा आगीत मृत्यू झाला. यात प्रथम असा प्रश्न पडतो, तो असा की, चालकाला झोप लागली म्हणजे ती मानवी चूक होती. तर मग दोष महामार्गाचा कसा? रात्रीच्या प्रवासात कसलेले व अनुभवी चालक लागतात, खासगी बसचे चालकच मुळी कंत्राटी असल्याने त्यांना नोकरीची कोणतीही हमी व शाश्वती नसते. कमी वेतनात अशा रोजंदारीवर काम करणाऱ्या लोकांच्या हाती बसेसचे स्टिअरिंग दिले जाते, मग अपघात तर होणारच. काही महिन्यांपूर्वी अशाच प्रकारचा अपघात नाशिक येथे झाला होता. यवतमाळ ते मुंबई अशी येणारी अशाच पद्धतीची बस पहाटेच्या सुमारास टँकरवर आदळून बस संपूर्ण खाक होऊन मोठी जीवित हानी झाली होती. असे अपघातच मुळी चालकांच्या चुकांमुळे व वाहनांच्या दोषांमुळे होतात. मात्र त्याचे खापर रस्त्यांच्या माथी मारले जाते. विदर्भ ट्रॅव्हल्सची बस लोखंडी खांब व कठड्याला लागून पलटी झाली.

दरवाजाकडील बाजू खालच्या दिशेने असल्याने त्यामुळे आतमध्ये झोपलेल्या प्रवाशांना बाहेर पडणे कठीण गेले. पुढील बाजूकडील बसचालक व बस वाहक व सहकारी पुढील बाजूने तत्काळ बाहेर आले. ही बस वातानुकूलित शयनयान पद्धतीची असल्याने मागील बाजूने असलेल्या आपत्कालीन दरवाजातून एक मुलगा तत्काळ बाहेर पडला. मात्र इतर प्रवासी कंपार्टमेंटमुळे अडकून पडले. या कंपार्टमेंटची रचना लाकडांपासून बनवली असल्याने ती पटकन पेट घेते. या अपघाताबाबतीतही हेच घडून आले. बसच्या डिझेल टाकीने पेट घेतल्याने बस ताबडतोब पेटली व जळाली. लांब पल्ल्यांच्या बसेसना डिझेलही जास्त लागत असल्याने टँकमध्ये भरपूर डिझेल होते. त्यामुळेच बस पेटून खाक झाली. हल्ली खासगी बसेसना एकमेकांशी जोरदार स्पर्धा करावी लागत असल्याने बसच्या रंगसंगतीपासून बसच्या प्रकारामध्येही प्रचंड स्पर्धा आहे. या स्पर्धेत सुरक्षिततेला हरताळ फासला जातो.

वास्तविक बसची प्रत्येक खिडकी ही आपत्कालीन दरवाजा असते. ती फोडली की, बसमधून बाहेर पडणे सोपे जाते. मात्र हल्लीच्या बस गाड्यांच्या काचा फोडण्यासाठी काहीच साधणे मिळत नाहीत. प्रवासी आतमध्ये अडकून पडतात. अपघातप्रसंगी प्रत्येक खिडकीजवळ काच फोडण्यासाठी लहान हातोडी असणे आवश्यक होते. मात्र ती नव्हती. म्हणून प्राणहानी झाली. बाहेरच्या बाजूने स्टिकर लावून बस गाडी सजवण्यात येते. या स्टीकरमुळे काचाही लवकर फुटत नाहीत परिणामी प्रवाशांच्या जीवावर बेतते. वास्तविक पाहता या बाबी वाहतूक प्राधिकरणाने काटेकोरपणे तपासल्या पाहिजेत. मात्र आपल्याकडे राजकीय वरदहस्तामुळे गाड्यांना नको तेवढी सूट देऊन ठेवली आहे. याला भ्रष्टाचारही मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे, असे म्हणावे लागेल. अशा बसेसला राज्यात पास करण्यास नकार दिल्यावर वाहतूकदार पाँडेचेरी, आसाम, ओडिसासारख्या राज्यातून पासिंग करून आणल्या जातात, जिथे काटेकोरपणे नियम लावले जात नाहीत. आता राहता राहिला प्रश्न तो प्रवाशांचा. दुर्घटनाग्रस्त बस प्रवाशांनी भरलेली होती. कोणताही खासगी वाहतूकदार बस भरल्यावरही अधिकचे प्रवासी गाडीत बसवतात. हा सर्व आर्थिक गणितांचा भाग असतो. भरपूर प्रवासी संख्या असताना, प्रवाशांच्या हक्काचे साधन असलेली एसटी यात मागे पडली ती का? समृद्धी महामार्ग सुरूझाल्यानंतर नागपूर ते शिर्डी मार्ग खुला झाला अन्‌ बस सुरू झाली. मात्र अत्यल्प प्रतिसादाअभावी ही बस महिन्याभरातच बंद पडली. छत्रपती संभाजीनगर ते नागपूर दरम्यान दिवसाला धावणारी साधी बस सुरू केली गेली, तीही काही दिवसांतच बंद करण्यात आली. एसटी प्रवासात महिला, ज्येष्ठ नागरिकांना सवलत देऊनही प्रवासी खासगी बस गाड्यांकडे का वळले जातात, याचा विचारही व्हायला पाहिजे.

एका अपघाताने सर्वांचे डोळे उघडले असतील, अशी आशा करणे फोल ठरेल. राजकारण्यांनीही एकमेकांवर कोणतीही चिखलफेक न करता अपघात कसे कमी करता येतील, हे पाहावे. सर्व शासकीय यंत्रणा जसे पोलिसांनी प्रामाणिकपणे आपली भूमिका चोख पार पाडली तरच वाहनचालक नियमांचे काटेकोर पालन करून वाहने चालवतील. वाहनांची देखभाल ठेवली तर अपघातांवर नियंत्रण नक्कीच मिळवता येईल. सुंदर अशा व अनेक जिल्ह्यांसाठी जीवनदायी ठरणाऱ्या बाळासाहेब ठाकरे समृद्धी मार्गाची होणारी बदनामी तरी टाळता येईल!

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# भारत राष्ट्र समिती:राजकीय धोरण आणि वास्तव

तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी आपल्या तेलंगणा राष्ट्र समिती या पक्षाचे नाव भारत राष्ट्र समिती असे करून या आपल्या पक्षाचा देशभर विस्तार करण्याची घोषणा ८ महिन्यापूर्वीच केली आहे. मात्र त्यांचा पक्षविस्ताराचा मुख्य भर फक्त महाराष्ट्रावरच आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या आधी निवडणुका होत असलेल्या मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ या राज्यांतील विधानसभा निवडणूक हा पक्ष लढविणार नाही, असे पक्षाने स्पष्ट केले आहे. नुकत्याच पार पडलेल्या कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत राव यांच्या पक्षाने सहभाग घेतला नाही. मात्र, महाराष्ट्रातील सर्व निवडणुका हा पक्ष पूर्ण ताकदीने लढविणार असल्याची घोषणा पक्षाचे सर्वेसर्वा के. चंद्रशेखर राव यांनी केली आहे. यासाठी मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रात अत्यंत खर्चिक स्वरूपाच्या सभा हा पक्ष घेत आहे. घउठ यांनी नुकतेच ४०० गाड्यांचा ताफा घेऊन आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करीत, आपल्या संपूर्ण मंत्रिमंडळासह त्यांनी पंढरपूर येथे भेट दिली आहे. या सभेत राष्ट्रवादीच्या एका नेत्यांनी त्यांच्या पक्षात प्रवेश केला आहे. यापूवी नांदेड, नागपूर, औरंगाबाद येथील काही अडगळीत पडलेल्या नेत्यांनी त्यांच्या पक्षात प्रवेश केला आहे.

के. चंद्रशेखर राव यांना रा.स्व.संघ–भाजपच्या इशाऱ्यावर चालणारा ब्राह्मणी मिडिया ज्या प्रकारे प्रसिद्धी देत आहे ते पाहता केसीआर प्रणीत भारत राष्ट्र समितीच्या महाराष्ट्रातील वावटळीमागे रा.स्व.संघ–भाजप असू शकते अशी शंका राजकीय निरीक्षकांडून व्यक्त करण्यात येत आहे. बीआरएसची एकंदरीत भूमिका, कार्यपद्धती आणि त्यांना मिळणारे मिडिया कव्हरेज पाहता ही शंका अजिबात निराधार आहे असे म्हणता येणार नाही. कारण भाजपची निवडणूक जिंकण्याची मुख्य मदार विरोधी मतांची फाटाफूट करण्यावर असते. मुस्लिम, बौद्ध इत्यादी ज्या लोकसमूहांची मते आपल्याला मिळत नाहीत ती कोणत्याही परिस्थितीत आपल्या मुख्य विरोधकांना ( काँग्रेस, राष्ट्रवादी, शीवसेना उबाठा इ.) मिळू नयेत यासाठी भाजपा काहीही करायला, कितीही खर्च करायला, कोणतीही तडजोड करायला तयार असतो. आता त्यात भाजपला त्यांच्या पूर्णतः विरोधात असलेल्या शेतकरी मतांची भीती वाटायला लागली आहे. यामुळे ङ्ग आमचा निर्धार.. शेताकऱ्यांचा उद्धार...! अबकी बार किसान सरकार..! अशा घोषणा देत के. चंद्रशेखर राव यांना शेतकऱ्यांचा तारणहार म्हणून प्रसिद्धी देण्यात येत आहे. के. चंद्रशेखर राव यांची मुलगी के. कविथा यांची अलीकडेच त्यांच्यावर अबकारी घोटाळ्याचा आरोप ठेऊन एऊ मार्फत चौकशी करण्यात आली होती. मात्र त्यानंतर तिच्यावर अटकेची व अन्य कारवाई करण्यात आली नाही हे पाहता RSS-BJP के. चंद्रशेखर राव यांना व त्यांच्या कुटुंबियांना एऊ चौकशीचा धाक दाखवून त्यांचा वापर महाराष्ट्राच्या राजकारणात मत विभाजन करण्यासाठी करू शकते. हे पाहता के. चंद्रशेखर राव (KCR) यांच्या आतापर्यंतच्या एकंदरीत राजकारणाचे तपासणी केली पाहिजे.

**के. चंद्रशेखर राव यांचा राजकीय पूर्वेतिहास !**

के. चंद्रशेखर राव यांनी युवक काँग्रेसमध्ये राजकीय कारकीर्द सुरू करण्यापूर्वी त्यांना "दुबई शेखर" म्हणून ओळखले जायचे. ते आखाती देशांमध्ये मजूर पाठवण्यासाठी एजंट म्हणून काम करायचे. यामध्ये त्यांनी अनेकांची फसवणूक केल्याने त्यांची बरीच बदनामी झाली. यामुळे त्यांना युवक काँग्रेस मधून काढून टाकण्यात आले. यानंतर ते १९८३ साली नुकत्याच स्थापन झालेल्या एन.टी. रामाराव यांच्या तेलगू देसम (टीडीपी) पक्षात गेले. त्यांनी सलग चार विधानसभा निवडणुका जिंकल्या. यानंतर टीडीपी प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू यांच्याशी मंत्रिपद देण्याच्या कारणावरून त्यांचे मतभेद झाल्याने त्यांनी टीडीपीचा राजीनामा दिला आणि २००१ मध्ये तेलंगणा राष्ट्र समितीची स्थापना केली.

त्याकाळात स्वतंत्र तेलंगणा राज्याची चळवळ जोरात होती. आंध्र प्रदेश मधील नेत्यांनी तेलंगणा भागाच्या विकासाकडे दुर्लक्ष केले म्हणून लोकांमध्ये चीड निर्माण झाली होती. स्वतंत्र तेलंगणा राज्य चळवळीचे मुख्य नेते मारोजू वीरन्ना, बेल्ली ललिता, तेलंगणा जल साधना समितीचे दुशर्ला सत्यनारायण आणि माओवादी चळवळीतील कार्यकर्ते या चळवळीची धुरा सांभाळून होते. माओवादी चळवळीतील कार्यकर्त्यांनी हैद्राबाद शहर आणि आसपासच्या प्रदेशात रेड्डी, कम्मा, कापू, वेलम्मा (घउठ या जातीचे आहेत) जातीच्या भांडवलदार आणि जमीनदार भूमाफिया यांनी मोक्याच्या जमिनी बळकावण्याविरुद्ध लोकांना जागृत केले होते. तेलंगणा चळवळीने निल्लू (पाणी), निधुलू (विकास निधी) आणि नियमकालू (रोजगार) या लोकांच्या उपजीविकेच्या समस्यांवर लक्ष्य केंद्रित केले होते. घउठ ने या चळवळीतील नेत्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी रामोजी राव यांनी फिल्म सिटीसाठी तत्कालीन आंध्र प्रदेश सरकारने दिलेल्या जमिनी आणि आंध्र रिअल इस्टेट डेवलपर्सच्या बिल्डर्सनी ताब्यात घेतलेल्या इतर हजारो एकर जमिनी परत घेण्याचे आणि त्यांचे भूमिहीनांना पुनर्वितरण करण्याचे आश्वासन दिले. केसीआरने ङ्गस्वतंत्र तेलंगणा राज्यङ्ग या लोकांमध्ये रुजलेल्या लोकभावनेचा धूर्तपणे वापर करून लोकांना भावनिक केले. ङ्गमी तर एक संत व्यक्ती आहे. मला पैसा किंवा सत्तेची महत्वाकांक्षा नाही. माझी दोन मुले अमेरिकेत स्थायिक झाली आहेत. त्यांना इकडे यायचे नाही. यामुळे मला कशाचाही मोह नाही, स्वतःसाठी आणि पत्नीसाठी एक शेर तांदूळ आणि एक कप डाळ इतकीच माझी गरज आहे. ङ्ग अशी भावनिक भाषणे लोकांना समजेल अशा तेलुगु भाषेतून करून त्यांनी या चळवळीचा मुख्य नेता म्हणून लोकांचा विश्वास संपादन केला.

केसीआर यांनी आपल्या वैयक्तिक राजकीय महत्वाकांक्षेला तेलंगणा अस्मितेशी चातुर्याने जोडले. यामुळे त्यांचा पूर्व इतिहास व सरंजामशाही प्रवृत्ती माहीत असूनही, त्यांचा निवडणुकीत पराभव झाल्यास स्वतंत्र तेलंगणा राज्य चळवळीचा अंत होईल या भीतीने लोकांनी त्यांच्या पक्षाला प्रत्येक निवडणुकीत पाठींबा दिला. उस्मानिया आणि काकतिया विद्यापीठातील प्राध्यापक, दलित विद्यार्थी, माओवादी चळवळीतील लोककलाकार, गायक आणि तेलंगणाच्या कर्मचाऱ्यांनी KCR च्या नेतृत्वाखालील स्वतंत्र तेलंगणा चळवळीला खुलेआम भक्कम पाठींबा दिला. यामुळे घउठ, स्वतंत्र तेलंगणा चळवळीचा चेहरा म्हणून स्थापित झाले. परिणामी, २ जून २०१४ रोजी तत्कालीन काँग्रेस सरकारला संसदेत विधेयक मांडून स्वतंत्र तेलंगणा राज्याची निर्मिती करणे भाग पडले.

**केसीआर यांनी तेलंगणा राज्य आंदोलनाशी केलेला विश्वासघात.**

केसीआर यांनी तेलंगणा राज्य स्थापन झाल्यावर त्यांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याचे आश्वासन काँग्रेस नेत्यांना दिले होते. मात्र राज्य निर्मितीनंतर त्यांनी या आश्वासनापासून घुमजाव केले. तेलंगणाच्या निर्मितीपूर्वी केसीआर यांनी राज्यनिर्मिती नंतर प्रत्येक कुटुंबाला एक सरकारी नोकरी, बेघरांसाठी दोन बेडरुमचे घर आणि प्रत्येक भूमिहीन दलित कुटुंबाला तीन एकर जमीन देण्याचे आश्वासन दिले होते, शिवाय राज्यात दलित मुख्यमंत्री देण्याचे आश्वासन दिले होते. यामुळे KCR यांना भूमिहीन दलित, आदिवासी, सुशिक्षित बेरोजगार इत्यादी समाजातील सर्व स्तरातील लोकांचा भक्कम पाठींबा मिळाला होता. निवडणूक जिंकल्यानंतर तेलंगणाला "आंध्र व्हल्चर्स" (तेलंगणाची तथाकथित लूट करणारे भांडवलदार, भूमाफिया, जमीनदार इ. ) विरुद्ध संरक्षण देण्याची घोषणा केली होती. मात्र निवडणूक जिंकल्यानंतर त्यांनी आपल्या सर्व घोषणांकडे पाठ फिरविली. निवडणुकीनंतर त्यांनी दलित नेता, तातिकोंडा राजैया यांना उपमुख्यमंत्री बनवले मात्र त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करुन काही महिन्यांत त्यांची हकालपट्टी केली. राजय्या यांच्यावर आजपर्यंत भ्रष्टाचाराचा कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही हे विशेष.

नाही म्हणायला घउठ यांनी काही विकास योजना सुरु केल्या. यामध्ये २०१५ मध्ये सुरु करण्यात आलेली आरोग्य लक्ष्मी योजना, कल्याण लक्ष्मी – शादी मुबारक योजना, शेतकऱ्यांसाठी रयथू बंधू योजना, आसरा पेन्शन योजना या प्रमुख आहेत. यातील बहुतेक योजना केंद्र सरकारच्या योजना आहेत. त्यांनी घोषित केलेल्या डबल बेडरुम हाउसिंग योजना अंमलबजावणीच्या पातळीवर फसलेली आहे. त्यांच्या कारभारामुळे दलित व अनुसूचित जाती त्यांच्या पक्षापासून मोठ्या प्रमाणात दुरावत आहेत. यामुळे त्यांना टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी हैदराबाद शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पुतळा उभारला तसेच वर्षभरापूर्वी दलित बंधू योजना सुरू केली. तरीही दलित व अनुसूचित जाती त्यांच्या पक्षापासून दुरावले आहेत.

**KCR एक अंधश्रद्धाग्रस्त निरंकुश राज्यकर्ता.**

मुख्यमंत्री बनल्यानंतर घउठ ची वेलामा जातीची जमीनदारी आणि सामंती प्रवृत्ती अधिक प्रखर झाली. एखाद्या सिंहासनाधीश राजाप्रमाणे त्यांनी कारभार सुरु केला. संवैधानिक लोकशाही व्यवस्था केवळ नावापुरती शिल्लक ठेवली. राज्याच्या तिजोरीतून त्यांनी मंदिरांना करोडो रुपये किमतीचे सोने आणि हिऱ्यांचे दागिने भेट दिले. करोडो रुपये खर्च करून मंदिरांचे नूतनीकरण करणे हे केसीआरचे आवडते कार्य बनले आहे. एकट्या यादगिरी मंदिराच्या नूतनीकरणासाठी घउठ सरकारने १२०० कोटी रुपये खर्च केले. राज्याच्या प्रत्येक प्रशासकीय कामाचा आरंभ ब्राह्मण पुजाऱ्यांकडून मुहूर्त पाहून मुहूर्ताप्रमाणे, काहीवेळा यज्ञ–होमहवन करून होऊ लागला. त्यांनी मंत्रिमंडळाचा शपथविधी सुद्धा मुहूर्त पाहून रात्री १२ वाजून ५७ मिनिटांनी ठेवला होता. घउठ त्यांचे आध्यत्मिक गुरु चिन्ना जेयर स्वामींच्या चरणाला सार्वजनिक साष्टांग नमस्कार घालून त्यांची पाद्यपूजा करण्याचे शासकीय कार्यक्रम आयोजित करतात. आपल्या धार्मिक गुरूंच्या सल्ल्यानुसार, त्यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात मंत्रिमंडळात महिलांचा समावेश करण्यास नकार दिला होता. मंत्रिमंडळात सामील एकमेव दलित नेता, तातिकोंडा राजैया हा अशुभ आहे असा सल्ला त्यांच्या गुरूने दिल्यावरून त्यांनी राजैया यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करुन काही महिन्यांतच त्यांची हकालपट्टी केली असे तेथील राजकीय नेत्यांचे म्हणणे होते. शासकीय इमारतींचे वास्तूदोष काढणे, त्यासाठी इमारतींची तोडफोड करणे हे तेलंगणा सरकारचे नेहमीचे काम आहे. वास्तूदोषामुळे त्यांनी त्यांच्या पूर्वसुरींनी वापरलेले मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान देखील सोडून दिले आणि प्रगती भवन नावाचे भव्य नवीन मुख्यमंत्री निवास बांधले. सचिवालयाला कधीही भेट दिली नसतानाही घउठ यांनी हेच कारण सांगून जुन्या इमारती नष्ट करण्याचे आदेश दिले. भव्य पुतळे उभारणे, ब्राह्मण भवन उभारणे, धार्मिक समारंभ व यज्ञ आयोजित करणे इत्यादी अनुत्पादक प्रकल्पांवर सार्वजनिक पैशांचा अपव्यय केल्याने राज्याची आर्थिक घडी पार विस्कटली आहे व आज तेलंगणा राज्यावर मोठ्या प्रमाणात कर्ज झाले आहे.

**तेलंगणा चळवळीची फळे कोण चाखत आहेत ?**

स्वतंत्र तेलंगणा आंदोलनाच्या मुख्य मुद्द्यांपैकी, सिंचन आणि पाणीपुरवठा या मुद्द्यांवर केसीआर सरकारने लक्ष केंद्रित केले. यासाठी सरकारी बाँडस आणि अन्य प्रकारे कर्ज उभारून हजारो कोटी रुपयांच्या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. यातील काही प्रकल्प सुरु करण्यात आले. काही पूर्ण करण्यात आले आहेत. या प्रकल्पांचे प्रमुख लाभार्थी हे सरंजामदार रेड्डी, वेलामा आणि कम्मा कंत्राटदार आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून प्रचंड भ्रष्टाचार करून घउठ यांच्या राजकीय वर्चस्वासाठी हे कंत्राटदार पैसा पुरवितात असा विरोधकांचा आरोप आहे. एकेकाळी केसीआरला घाबरणारे कंत्राटदार, चित्रपट अभिनेते आणि गुंतवणूकदार आता त्यांचे मित्र आणि वित्त पुरवठा करणारे लोक आहेत.

आपल्याला सत्ता आणि पैशाचा मोह नाही, आपली मुले अमेरिकेतून परत येणार नाहीत असे सांगणाऱ्या KCR चा मुलगा तारका रामाराव उर्फ केटीआर हा तेलंगणाच्या मंत्रिमंडळात आयटी, महानगरपालिका प्रशासन आणि शहरी विकास खात्याचा कॅबिनेट मंत्री आहे. हैदराबाद मधील चित्रपट सृष्टी व हॉटेल उद्योग, आयटी उद्योग त्यांच्या नियंत्रणात आहे. त्यांची मुलगी कविता ही निजामाबादची खासदार होती. सध्या ती विधान परिषद सदस्य आहे. त्या ब्युटी पार्लर आणि वेलनेस उद्योगातील बड्या प्रस्थ आहेत. त्यांचा पुतण्या, हरीश राव, सिद्धीपेटचा आमदार आणि तेलंगणाचा अर्थ खात्याचा कॅबिनेट मंत्री आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या व त्यांच्या जातीतील व नात्यातील खास लोकांच्या ताब्यात हैदराबाद शहरातील रिअल इस्टेट उद्योग आहे. त्यांचे कुटुंबीय अनेक खाजगी रुग्णालयांचे मालक आहेत. शासन, प्रशासन व उद्योग यामध्ये KCR यांच्या वेलामा जातीचा दबदबा आहे.

**विद्यापीठातील शैक्षणिक व्यवस्थेचा बोजवारा.**

तेलंगणा आंदोलनादरम्यान, उस्मानिया आणि काकतिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या आंदोलनाद्वारे टीआरएससह राजकीय पक्षांच्या राजकारणावर दबाव ठेवला होता. घउठ सत्तेवर आल्यानंतर त्यांनी राज्यातील विद्यापीठातील चळवळ खच्ची करण्याचे धोरण अवलंबिले. विशेषतः विद्यापीठे व शैक्षणिक संस्था यामधील दलित विद्यार्थ्यांची चळवळ त्यांनी चिरडून टाकली. विद्यापीठातील प्राध्यापकांची भरती त्यांनी रोखून धरली आहे. आपल्या मजीतील नोकरशहांना त्यांनी बहुतेक विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या पदाचा प्रभारी पदभार दिला आहे. जिथे उपेक्षित दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीय (जइउ) समुदायातील विद्यार्थी मोठ्या संख्येने आहेत त्या सरकारी विद्यापीठांना कमजोर करून खाजगी विद्यापीठांना उत्तेजन व सवलती देण्याचे घउठ सरकारचे धोरण आहे.

**सामाजिक न्याय विरोधी BRS.**

घउठ एक निरंकुश सरंजामशाही व जातीयवादी राजकारणी आहे हे त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या वर्तनावरून वेळोवेळी सिद्ध झाले आहे. त्यांच्या पक्षाचे नेते व कार्यकर्ते दलित, आदिवासी आणि ओबीसी नेत्यांशी गैरवर्तन करतात. बरेचदा शारीरिक हल्लेसुद्धा त्यांनी केले आहेत. वारंगलचे माजी खासदार, आदिवासी नेते रवींद्र नाईक, दलित नेते, आमदार चंद्रशेखर आणि खासदार सरसिल्ला राजैया, ओबीसी नेते अनिल कुमार एलावथीआदी नेत्यांना टीआरएस कार्यकर्त्यांनी मारहाण केली. आजही घउठ च्या पक्षाचे उच्च जातीय कार्यकर्ते दलित, ओबीसी,आदिवासी यांना प्रचंड दहशतीखाली ठेवतात. घउठ च्या राजवटीत सामाजिक न्याय व उपेक्षितांचे कल्याण यांना अत्यंत नगण्य स्थान आहे.

**सुनील खोबरागडे** मुंबई

# युती सरकारच्या वर्षपूर्ती निमित्त लेख...

## सर्व सामान्याच्या हिताला प्राधान्य

कुठल्याही सरकारचा एक वर्षाचा कार्यकाळ हा राज्य कारभाराची घडी निट बसविण्यामध्येच निघून जातो. नवे सरकार, नवीन प्रशासकीय टीम व नवे मंत्रिमंडळ यामुळे अनेक आव्हान सरकारपुढे असतात. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून २०२२ रोजी कार्यभार स्वीकारताच राज्याच्या विकासाला चालना देण्यास सुरुवात केली होती. त्याला आता एक वर्ष पूर्ण होत आहे. प्रदीर्घ राजकीय अनुभव व विकासाची दृष्टी यामुळे या सरकारने वर्षभरात शेकडो लोककल्याणकारी निर्णय घेतले. सामान्य माणूस, शेतकरी, कष्टकरी, महिला व तरुण यांच्या हिताला प्राधान्य देणा?या निर्णयाचा वर्षपूतीच्या निमित्ताने घेतलेला हा आढावा...

कुठल्याही विकासाचा मापदंड हा त्या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या मूलभूत सुविधा हाच असतो. लोकांचे राहणीमान, त्यांची वाढलेली क्रयशक्ती, नागरिकांना मिळणाऱ्या सोई सुविधा, दळणवळण हीच विकासाची खरी ओळख आहे. वर्षभरापूर्वी सत्तेत आलेल्या युती सरकारने याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. विकासाचा समतोल राखत सर्व विभागाला समान न्याय देण्याची सरकारची भूमिका राहली आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी तर हे सरकार खंबीरपणे उभे राहिले आहे. जून ते ऑक्टोबर या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या नुकसान भरपाईपोटी ६२ हजार ६० शेतकऱ्यांना ७०९३.१९ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. मार्च २०२३ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसानभरपाईपोटी १७७ कोटी ८० लाख रुपयांचा निधी सरकारने तातडीने उपलब्ध करून दिला. सोयाबीनवर शंखी गोगलगाईमुळे पाच जिल्ह्यात ०.७३ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले यासाठी ९८.५८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

प्रत्येक जिल्ह्यातून किमान ७५ हजार लाभार्थ्यांना विविध योजनांचा थेट लाभ देणारा ङ्गशासन आपल्या दारीङ्ग उपक्रम राज्यभर सुरू आहे. या उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. देशात आणीबाणीच्या काळात बंदिवानांना पूर्वीप्रमाणेच मानधन देण्याचा निर्णय घेऊन सरकारने बंदीवनाप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के व कक्षेबाहेरील ५० टक्के पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या तरुण तरुणींना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील पदभरतीसाठी टीसीएस, आयबीपीएसमार्फत परीक्षा ७५ हजार रिक्त पदे भरती सुरु करण्यात आली.

आदिवासी गावांमध्ये १७ संवर्गातील सरळसेवेची १०० टक्के पदे स्थानिक आदिवासींमधून भरण्याचा महत्वाकांक्षी निर्णय या सरकारने घेतला आहे. याचा लाभ शेकडो आदिवासी तरूण तरुणींना होणार आहे. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडाफ या उपक्रमात नागरिकांच्या अर्जावर शंभर टक्के निपटारा करण्यात आला आहे. याचा लाभ शेकडो नागरिकांना झाला. वर्ग ३ मधील लिपिकांची सर्व रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणार आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ४५०० किमी जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गासाठी तीन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रस्ते व पुलांसाठी सुद्धा भरीव तरतूद करण्यात आली आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत राज्यात ६५०० किमीचे रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



८६ हजार ३०० कोटी रुपये खर्च करून पवनार (वर्धा) ते पात्रादेवी (सिंधुदुर्ग) महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग उभारला जाणार आहे. पाणंद शेत रस्त्यासाठी महाराष्ट्र ग्रामसमृद्धी ही नवी योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे पाणंद रस्त्याचा मोठ्या प्रमाणात विकास होण्यास मदत होणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास मोफत करण्यात आला असून या योजनेचा आतापर्यंत ४ कोटीपेक्षा जास्त ज्येष्ठांना लाभ झाला आहे. महिलांना एसटी प्रवासात सरसकट ५० टक्के सुट देण्याचा क्रांतिकारी निर्णय या सरकारने घेतला. या योजनेचा राज्यात आतापर्यंत करोडो महिलांना फायदा झाला आहे. यासाठी महिला शासनाला धन्यवाद देत आहेत.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेचा राज्यातील १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना लाभ होणार आहे. १ कोटी पेक्षा जास्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेचा लाभ मिळेल.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आता केवळ १ रुपयांत पीकविमा काढता येणार आहे. यासाठी ३३९२ कोटी रुपये सरकार भरणार आहे. पीएम किसान योजनेची कार्यपद्धती सुधारण्याचा निर्णय महत्वाकांक्षी निर्णय घेऊन सरकारने लाखो शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. राज्यात महा कृषी विकास अभियान राबविण्यासाठी सरकार ५ वर्षात ३ हजार कोटी रुपये देणार आहे. २०१७ छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत उर्वरित पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याचा निर्णय ही सरकारने घेतला आहे.

मागेल त्याला शेततळे योजनेचा आता व्यापक विस्तार होणार असून त्यावर सरकार १००० कोटी रुपये खर्च करणार आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सरकारकडून राबविण्यात येणार असून या योजनेचा लाभही आता २ लाखांपर्यंत करण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनला मुदतवाढ देण्याचा तसेच राज्यभर व्याप्ती वाढविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ३ वर्षात २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रीय शेतीखाली आणण्याचा व एक हजार जैवनिविष्ठा स्त्रोत केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेऊन सरकारने शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात शेतक?यांना १२ कोटींहून अधिक अनुदान थेट खात्यावर जमा करण्यात आले आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना– २ ही ३० जिल्ह्यांत राबविण्यात येणार आहे. १४४ प्रकल्प मंजूर असून ५ लाख ६५ हजार ९८६ हेक्टर क्षेत्राला सिंचन मिळणार. केंद्राने ५० कोटी ८ लाख यासाठी दिले असून राज्याने ३३ कोटी ३९ लाख निधी दिला आहे. राज्याच्या सिंचन वाढीसाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. विकासाच्या विविध योजना व त्याची अंमलबजावणी करण्यासाठीचे प्रामाणिक प्रयत्न यामुळेच लोककल्याणकारी सरकार म्हणून या सरकारची जनमानसात प्रतिमा निर्माण झाली आहे.

**रवि गिते**
**जिल्हा माहिती अधिकारी,गोंदिया**

# तर कसा होणार जिल्ह्याचा विकास?

**गोंदिया:** जिल्हा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी स्वत:च १३ महिन्यांपासून हजर राहत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील विकासकामे व सर्वसामान्यांचे प्रश्न कसे सोडवावे असा प्रश्न जि.प. स्थायी समिती सदस्य सुरेश हर्षे यांनी केला आहे. पुढील सभेला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बैठकीला उपस्थित राहावे यासाठी जिपच्या अध्यक्षांकडे विनंती केली आहे.

जुन महिन्यातील स्थायी समितीच्या बैठकीचे आयोजन २७ जून रोजी करण्यात आले होते. मात्र, संततधार पावसामुळे अध्यक्षांनी ही सभा रद्द करुन ३० जून रोजी दुपारी १ वाजता सभा पाचारण करण्यात आली. परंतु ३.२५ वाजता सभेला सुरुवात झाली. यावेळी अध्यक्ष व स्थायी समितीचे सर्व सदस्य उपस्थित असतना मुख्य कार्यकारी अधिकारी मात्र अनुपस्थित होते. तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रकल्प संचालक, कार्यकारी अभियंता याव्यतिरिक्त अनेक विभाग प्रमुख सभेला अनुपस्थित असल्याचे जदसून आले. परिणामी अनेक महत्वाचे प्रश्न जिल्ह्याचे मार्गी न लावता सभा गुंडाळण्यात अली. यावेळी स्थायी समितीचे सदस्य सुरेश हर्षे यांनी जिल्हा परिषदेच्या १३ महिन्याच्या कार्यकाळामध्ये मुख्य कार्यकारी अकिकारी हे स्थायी समितीला कधीच उपस्थित झाले नाही व जिल्हा परिषदेच्या सर्वसाधाण सभेला फक्त एकच सभेल अर्धा तास उपस्थित राहून निघून गेले असल्याचा मुद्दा उपस्थित केला.

यावेळी हर्षे यांनी जिपच्या सभागृहामध्ये जिल्ह्याच्या विकास कामावर व जिल्ह्यामध्ये महत्वपूर्ण विभागातील जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याचे उद्देशाने एखादा कुठलाही मुद्दा उपस्थित केला असता विभागप्रमुख सभेला उपस्थित राहत नसल्याने त्यांचे प्रतिनिधी उत्तर देताना विभाग प्रमुखांना विचारतो, विभागप्रमुखांना सांगतो किंवा मुख्य कार्यकारी अधिकरी किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत बोलून प्रश्न मार्गी लावतो असे म्हणून फक्त वेळ काढून काम करत असल्याचा आरोप केला. हर्षे यांच्या मते स्थायी समितीच्या सभेला सर्व विभाग प्रमुख व राज्य शासनाचे महत्वाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणे अपेक्षीत आहे. मात्र त्यांच्या अनुपस्थितीमुळे जनतेचे प्रश्न वेळीच मार्गी लागत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील विकास कामे व सर्व सामान्यांचे प्रश्न कसे सुटणार, असा प्रश्न जि.प. वर्तुळात केला जात आहे.



**मुख्य कार्यकारी सभेला उपस्थित राहल्यास कुठलाही अधिकारी वाटेल त्याप्रमाणे उत्तर देणार नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम ९५ च्या तरतुदी अनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेला उपस्थित राहण्याची तरतुद आहे. त्याकरिता अध्यक्षांनी पुढच्या सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व विभाग प्रमुखांना उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावे अशी मागणी अध्यक्षांकडे केली आहे.**

**सुरेश हर्षे, जि.प. व स्थायी समिती सदस्य, गोंदिया**

**स्थायी समितीच्या बैठकीला उपस्थित राहणे बंधनकारक नाही**

**स्थायी समितीच्या बैठकीला उपस्थित राहिलेच पाहिजे असे गरजेचे नाही किंवा तसे बंधनकारक नाही. तर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेला उपस्थित राहणे गरजेचे आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीला आवश्यक वाटल्यास उपस्थित राहतो.**

**अनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया**

### अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**स्थायी समितीच्या बैठकीत समिती सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवरुन सभा अध्यक्षांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत पुढच्या सभेच्या आधी सर्व प्रश्न मार्गी लावण्यात यावे, अन्यथा कारवाई करण्यात येईल अशी ताकीद देत पशुसंवर्धन पर्यवेक्ष यांची पदोन्नती, सर्व शिक्षा अभियानांतर्गत पदवीधर शिक्षकांची बदली, सहाय्यक शिक्षकांच्या झालेल्या बदल्यांमध्ये त्रुट्या, एकआरजीएस कंत्राटी अभियंते, गृहनिर्माण अभियंते, या सर्वाचे मुद्याचे निराकरण करुन त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले.**

# आरोग्य विभागाचा कारभार रामभरोसे

**गोंदिया:** जिल्हा परिषद आरोग्य विभाग कर्मचाऱ्यांना पावसाळ्याच्या दिवसात मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. तसे परिपत्रक काढून विभागाला सुचना दिली जाते. मात्र बहुतेक कर्मचारी सुचनांना बगल देऊन परिपत्रकालाच केराची टोपली दाखवत असल्याचे दिसून येत आहे. अनेक कर्मचारी रेल्वेने प्रवास करतात. त्यातच रेल्वेगाड्याही उशिरात धावत असल्याने वेळेत कार्यालयात पोहचण्यास विलंब होत आहे. परिणामी आरोग्य विभागाचा कारभार रामभरोसे चालत असल्याचे दिसत आहे.

यंदा उशिरा का होईना आर्द्रा नक्षत्रापासून खऱ्या अर्थाने पावसाने हजेरी लावली. पावसाळ्यात जलजन्य आजार उद्‌भवण्याची अधिक शक्यता असते. आरोग्य विभागाने सतर्क राहणे गरजेचे आहे. आरोग्य केंद्रामध्ये पुरेसा औषधसाठा ठेवणे आवश्यक आहे.



जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग सज्ज असून प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पुरेसा औषधसाठा ठेवला जात असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याची दिलेली सुचना पचणी पडण्यासारखी नसावी. आरोग्य विभागाचे कर्मचारी मोठमोठ्या शहरातून, अजूनही ये-जा करीत आहेत. रेल्वेच्य वेळापत्रकानुसार त्यांचा कार्यालयीन कारभार सुरु आहे.

विशेष म्हणजे सध्या रेल्वे तासनतास उशिवा धावत आहेत. त्यामुळे आरोग्य कर्मचारीसुद्धा वेळेत हजर राहत नाही. याही पलीकडे सायंकाळी कार्यालयीन वेळेच्या आत रेल्वेच्या परतीच्या वेळापत्रकानुसार कर्मचारी कार्यालय सोडत आहेत. याचा फटका रुग्णांना बसत आहे. विशेष म्हणजे अधिकाऱ्यांचे ही याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांच्या आरोग्याची काळजी आरोग्य विभाग योग्यरितीने घेईल का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### अधिकाऱ्यांची भिती नाही

**आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांसारखेच तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदारांना पावसाळ्याच्या दिवसात मुख्यालयी राहणे गरजेचे आहे. मात्र जिल्ह्यातील बहुतेक तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार मुख्यालयी राहत नाहीत. नागपूर, भंडारा, तुमसर, तिरोडा अशा शहरात त्यांचे वास्तव्य आहे. अधिकाऱ्यांची भीती नसल्याने अप-डाऊनच हा सारा खेळ सुरु आहे.**

# पोरगं शिकेना, गुरुजी कधी येणार साहेब?

## ९७ शाळांत एकच शिक्षक: चार वर्गाला एकटा कसा सांभाळणार




**गोंदिया:** शाळा सुरु झाल्या. मात्र शिक्षकांच्या रिक्त पदांचे ग्रहण अजुनपर्यंत सुटले नाही. दुर्गम भागातील अनेक शाळांमध्ये एकच शिक्षक कार्यरत आहे. आंतरजिल्हा बदली होऊन जाणारे शिक्षक, सेवानिवृत्त होणारे शिक्षक यामुळे रिक्त पदांचा डोंगर जिल्ह्यात वाढत चालला आहे.

जिल्ह्यत प्राथजमक शिक्षकांची जवळपास ८१९ पदे रिक्त आहेत. शिक्षकांची पदे रिक्त असली तरी शाळा बंद राहणार नाही. याची खबरदारी शिक्षण विभगामार्फत घेतली जाते. पहिली ते चौथी किंवा पहिली ते पाचवीपर्यंत असलेल्या शाळांसाठी दोन शिक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

मात्र काही शाळांमध्ये आता एकच शिक्षक आहे. पहिली ते आठवीपर्यंतच्या शाळांमध्ये पाचपेक्षा अधिक शिक्षक व मुख्याध्यापकाचे पद मंजूर राहते. मात्र त्या ठिकाणी तीन ते चारच शिक्षक नियुक्त केले जातत. एखाद्या शिक्षकाकडे मुख्याध्यापकांचा पदभार सोपविला जातो. याचा अध्ययन व अध्यापनावर मोठा परिणाम होतो.

**प्राथमिक शिक्षकांची ८१९ पदे रिक्त**

जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यात एकूण १०६१ शाळा असून या शाळांमध्ये ८६ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. शिक्षण विभागात एकुण ३८७४ पदे मंजूर असून यापैकी ३०५५ पदे भरली आहेत. तर ८१९ पदे अद्यापही रिक्त आहेत.

**रिक्त जागांचा विद्यार्थ्यांना फटका**

गोंदिया जिल्ह्यात ९७ शाळांमध्ये एकच शिक्षक आहे. शिक्षक शालेय कामासाठी तालुका स्तरावर गेल्यानंतर शाळा बंद ठेवण्याची वेळ येते. शाळा बंद राहत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. मात्र काहीच पर्याय राहत नाही.

**पाच वर्षात भरती नाही**

खासगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळा कुठेही मागे राहू नयेत. यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. पण मागील तीन-चार वर्षापासून जि.प. शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

**शिक्षकांवर ताण वाढला**

चार वर्गाना शिकविणे, मुख्याध्यापकाचे काम करणे यामुळे शिक्षकांवर कामाचा ताण वाढत चालला आहे.प्रशासकीय कामे सुद्धा शिक्षकाला करावी लागतात.

**दुर्गम भागाला बसते झळ**

जसजशी रिक्त पदांची संख्या वाढत जाते. त्याचा सर्वाधिक फटका दुर्गम भागातील शाळांना बसतो. या शाळांमध्ये दोन शिक्षक असल्यास तेथील एका शिक्षकाला दुसऱ्या शाळेत नियुक्ती दिली जाते व कारभार चालविला जातो.

# नगर विकास आघाडीच्या कार्यालयाचे लोकार्पण

**सालेकसा:** सालेकसा नगरपंचायत क्षेत्रात विकासाच्या मुद्द्यावर समाजकारण आणि राजकारण एकत्रित करून सर्व समाजसेवी नागरिकांना समाविष्ट करण्याच्या ध्येय आणि धोरण घेत सालेकसा क्षेत्राचे सर्वांगीण विकास करण्याचे उद्देश्य डोळ्यासमोर ठेवून नगर विकास आघाडी चे स्थापना करण्यात आली. सालेकसा नगरपंचायत क्षेत्रामध्ये आमगाव खुर्द ग्रामपंचायतचे समावेश करण्यासाठी सुद्धा नगरविकास आघाडीचा सिंहाचा वाटा होता. याच नगर विकास आघाडीच्या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन मोठ्या थाटात करण्यात आला. यासाठी खुद्द वरून देवता सुद्धा आवर्जून उपस्थित होत पावसाने हजेरी लावली.

या कार्यालयाच्या माध्यमातून नगरपंचायत क्षेत्रामध्ये होणा?या असुविधेबाबत नागरिकांनी आपल्या समस्या मांडाव्या व त्या नगर विकास आघाडीच्या माध्यमातून सोडवण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल असे आश्वासन देत नगर विकास आघाडीचे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले. कार्यक्रमाच्या



उद्घाटक म्हणून ओबीसी संघर्ष कृती समितीचे जिल्हा अध्यक्ष बबलू कटरे तर दीप प्रज्वलक म्हणून आमदार विनोद अग्रवाल यांच्या धर्मपत्नी सविता अग्रवाल उपस्थित होते. मुख्य अतिथी म्हणून मंचावर रोहित अग्रवाल व पलक अग्रवाल उपस्थित होते.

क्षेत्राच्या विकासासाठी राजकीय पक्षांपेक्षा इच्छाशक्ती महत्त्वाची असते. याच इच्छाशक्तीचा जोरावर क्षेत्राच्या सर्वांगीण विकास व नागरिकांचे आर्थिक विकास करता येतो. आणि यासाठी अशी इच्छाशक्ती असणा?यांनी पुढे येवून गावाचा विकास करणे व त्यासाठी राजकारणात पुढे येणे आवश्यक आहे. नगर विकास आघाडी यासाठीच स्थापन करण्यात आली असून नागरिकांनी आता विकासासाठी राजकारण करणे आहे आणि नागरिक सुजाण आहेत वेळेवर योग्य निर्णय घेतील असे प्रतिपादन उद्घाटक बबलू कटरे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल हटवार, सूत्र संचालन यशवंत शेंडे तर आभार मनोज डोये, यांनी मानले. या कार्यक्रमात रूपलाल नागपुरे, विनोद वैद्य, सुनील असाटी, रोहित बनोठे, डॉ. विकास डोये, गोल्डी भाटिया, भौतिक हरिणखेडे, उमंग बंसोड, सुरेंद्र डोये, अंकुश कसार, मयूर पाथोडे, स्वप्नील करवाडे, अंजली हटवार व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# अधिकारी,कर्मचारी नॉटरिचेबल

## उपविभागीय अभियंता कार्यालय वाऱ्यावर,शिपाईच राहतो हजर

**गोरेगाव:** येथील पंचायत समिती कार्यालयानजीक उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय आहे. या कार्यालयात ६ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत. पण अनेक महिन्यापांसून अधिकारी, कर्मचारी कार्यालयात येत नसल्याने शिपाई दरदिवशी हजेरी लावून कार्यालयाची शोभा वाढविण्याचा कर्तव्त बजावत आहे. गोरेगाव तालुक्याला दोन आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष मिळाले असून कोणाचाही लक्ष नसल्याने हा कार्यालय शोभेची वास्तू ठरली आहे.

गोरेगाव तालुक्यातील नागरिकांसह राजकीय पुढाऱ्यांनी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभागाची मागणी



केल्याने विश्रामगृह पटांगणात हे कार्यालय सुरु करण्यात आले. या कार्यालयात ६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यात एक उपविभागीय अभियंता, दोन सहाय्यक अभियंता, कारकून, वाहन चालक, शिपाई असे पदे मंजूर आहेत. पण यापैकी केवळ शिपाई कार्यालयात हजेरी लावत आहे. येथील कार्यरत अधिकारी व कर्मचारी गोंदिया व नागपूर शहरातून अपडाऊन करीत असल्याची चर्चा आहे. त्यामुळेच कार्यालयात कर्मचारी उपस्थित होत नाहीत.

अनेकदा कार्यालयात माहिती इतर कामाकरिता नागरिक जावून उपविभागीय अभियंता व इतर कर्मचाऱ्यांबाबत शिपायाला विचारणा केल्यास बाहेर फिल्डवर गेल्याचे बतावनी केली जाते. त्यामुळे अनेकांना त्रास सहन करावा लागत आहे. या कार्यालयाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष तर आहे पण दोन आमदार, एक जिल्हा परिषद अध्यक्ष या तालुक्याला लाभ, असून यांचाही स्पेशल दुर्लक्ष आहे. तालुक्यातील नागरिकांच्या अनेक समस्या आहेत.

या समस्यांचे सोडवणूक करणारा वाली नसल्याने समस्येत दरदिवशी वाढ होताना दिसून येत आहे. अधिक माहितीसाठी गोंदिया येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अभियंता नरेश लबाने यांच्याशी मोबाईलद्वारे संपर्क केले असता ते नाटरिचेबल सांगत असल्याने माहिती मिळविता आली नाही. लोकप्रतिनिधी नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी उदासीन झाले असून त्यांना संजीवनी बुटी देण्याची गरज आहे.

## भंडारा तत्कालीन एसडीओ राठोडसह दोन तहसिलदार निलबिंत

**भंडारा:-** भंडारा जिल्ह्यातील भंडारा उपविभागातंर्गत येत असलेल्या भंडारा व पवनी तालुक्यातील पोलीस पाटील व कोतवाल भरती प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी केलेल्या चौकशीत त्रुट्या आढळून आल्याने विभागीय आयुक्तांच्या सुचनेवरुन पालघर येथील विद्यमान रोहयो उपजिल्हाधिकारी व भंडाराचे तत्कालीन उपविभागीय अधिकारी रविंद्र राठाडे यांच्यासह भंडारा तहसिलदार अरविंद हिंगे व पवनीच्या तत्कालीन तहसिलदार निलिमा रंगारी यांना निलबिंत करण्यात आले आहे.महसुल व वनविभागाचे अवर सचिव संजीव राणे यांच्या स्वाक्षरीने २७ जून रोजी निलबंनाचे आदेश काढण्यात आले.यामध्ये भंडारा उपविभागीय अधिकारी कार्यालयातंर्गत झालेल्या पोलीस पाटील भरतीमध्ये अनियमिततेसंदर्भात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी भंडारा प्राथमिक चौकशी केली असता या चौकशीत तक्रारीत तथ्य आल्याचे २० जून रोजी विभागीय आयुक्त कार्यालयाने सादर केलेल्या अहवालात म्हटले गेले.त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा नियमअंतर्गत तत्कालीन उपविभागीय अधिकारी रविंद्र राठौड, भंडारा तहसीलदार अरविंद हिंगे आणि पवनीचे तत्कालिन तहसीलदार नीलिमा रंगारी यांना निलंबित करण्यात आले आहे.निलबिंत काळात त्यांचे मुख्यालय पालघर,भंडारा व चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय निश्चित करण्यात आले आहे.

## जिल्हा परिषद, गोंदिया ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

**ई-निविदा सुचना क्र.०३ प्रथम वेळ सन २०२३-२४**

जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत तालुकास्तरीय प्लॉस्टीक कचरा व्यवस्थापन प्रकल्प, अंतर्गत कामासाठी प्रपत्र क्र-१ मध्ये दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करित आहे.

निविदेच्या अटी व शर्ती व सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या इलेक्टानिक निविदा व्यवस्थापन प्रणालीचे http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०३.०७.२०२३ नंतर पहायला मिळेल.

**टिप:** कामाची निविदा व वेळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे.

**(सुमित सि.बेलपत्रे)**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद, गोंदिया**

# सडक अर्जुनी-शेंडा मार्ग जीवघेणा

**सडक अर्जुनी:** सडक अर्जुनी ते शेंडा य मार्गाचे नव्याने बांधकाम करण्यात येत असून गेल्या चार ते पाच वर्षापासून या रतस्ताचे बांधकाम संथमतीने करण्यात येत आहे. त्यामुळे मार्गावरील खड्डे अपयताला आमंत्रण देत आहेत. विशेष म्हणजे शेंडा ते सडक अर्जुनी दरम्यान ७ किमी लांब मार्गाचे बांधकाम करण्यात आले असून अद्यापही उर्वरित मार्गाचे बांधकाम पूर्णत्वास आलेले नाही. संबंधित कंत्राटदार कंपनीकडून कामात दिरंगाई करण्यात `त असतानाच रस्त्याच्या कडा भरण्यासाठी कंत्राटदाराने मुरूमाऐवजी शेतातील मातीचा वापर केला आहे. त्यामुळे या मार्गावर पावसामुळे वाहन स्लिप होऊन अपघात घडत आहेत. परिणामी हा मार्ग आता जीवघेणा ठरत आह.

शेंडा ते सडक अर्जुनी मार्गाच्या बांधकामासाठी २७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून या बांधकाामाचे कंत्राट नागपूर येथील एका खासमी कंपनीला देण्यात ाले आहे. सदर कंपनीकडून रस्ता बांधकामात दिरंगाई करण्यात येत आहे. त्यामुळे आतापर्यंत केवळ अर्ध्याच रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तर ज्या ठिकाणी रस्त्याच्या दोन्हा बाजूच्या कडा भरण्यासाठी कंत्राटदारानी मुरुमाऐवजी खड्डा पडला असून खड्ड्यात पावसाचे पाणी साचले आहे.

या खड्ड्यात जनावरे किंवा लहान मुले पडण्याची भीती असतानाच साचलेल्या पाण्यातून संसर्गजन्य आजार पररण्याची भीती आहे. तेव्हा या प्रकरणी स्वत: मुनेश्वर यांनी स्थानिक तहसीलदारांकडे तक्रार केली आहे. मात्र याकडेही कानाडोळा करण्यात येत आहे.

### महिला आर्थिक विकास महामंडळाने गाठला १०० कोटीचा टप्पा

**गोंदिया :-** माविम मुख्यालय यांच्या मार्गदर्शनानुसार गोंदिया जिल्ह्याचा वर्ष २०२३-२४ चा क्रेडीट प्लॅन सेमिनार माविम जिल्हा कार्यालयाच्या प्रशस्त हॉलमध्ये आयोजित करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने ऑनलाइन पध्दतीने राजु इंगळे, विभागीय सनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी माविम नागपुर विभाग, अविनाश लाड, सहा.महाप्रबंधक नाबार्ड गोदिया, रोशन पंचबुद्धे प्रभाकर मिश्रा हरिश युगल कटरे श्री रामटेके श्री कुणाल, एस.एस. छापरे, स्वरुप कटरे, भूपेंद्र नायडू व स्वाती चौहाण स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्यासह जिल्ह्यातील जिल्हा स्टाफ उपस्थित होते.

# भरधाव वाहन चालविणे १०१ जणांना पडले महागात

**गोंदिया:** जिल्ह्यातील अपघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन नागरिकांमध्ये विशेषतः गोंदिया शहरातील नवतरुण - तरुणी आणि जनतेमध्ये वाहतुकीच्या नियमांची जागृती व्हावी, वाहतुकीला शिस्त लागावी, वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी, याकरिता पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी अभियान सुरू करण्याचे निर्देश दिले होते.

भरधाव वेगात वाहन चालवून लोकांच्या जिवाला धोका निर्माण करणाऱ्याविरूद्ध दोन दिवसात कारवाई करून १०१ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

गोंदिया जिल्ह्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरूद्ध २४ व २५ जून रोजी कारवाई करण्यात आली. हलगर्जीपणे वाहन चालविणे, लापरवाहीने भरधाव वेगात वाहन चालविणे, विरूद्ध दिशेने गाडी चालविणे अशा लोकांवर भादंविच्या कलम २७९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

गोंदिया जिल्हा पोलिस प्रशासन जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी व गोंदियाकरांचा त्रास कमी करण्याकरिता कटिबध्द असल्याचे पोलिस विभागाने म्हटले आहे. सर्व पोलिस ठाणे, वाहतूक शाखा, जिल्ह्यातील वाहतूक रहदारीचे योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करून सदैव प्रयत्नशील आहेत.



### हलगजीपणे वाहन चालविणाऱ्यांवर दोन दिवसात दाखल केलेले गुन्हे

| पोलिस ठाणे | दाखल गुन्हे | पोलिस ठाणे | दाखल गुन्हे |
|---|---|---|---|
| गोंदिया शहर | ०७ | गोरेगाव | ०९ |
| गोंदिया ग्रामीण | ११ | सालेकसा | ०२ |
| रावणवाडी | ०२ | देवरी | ०४ |
| तिरोडा | ११ | डुग्गीपार | १० |
| गंगाझरी | ०३ | अर्जुनी / मोरगाव | ०६ |
| दवनीवाडा | ०८ | नवेगावबांध | ०७ |
| आमगाव | १० | केशोरी | ०६ |
| | | चिचगड | ०५ |

### अल्पवयीन मुलांनी नियमांचे पालन करावे

**गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांना विशेषतः अल्पवयीन मुले - मुली, शाळकरी विद्याथी आणि त्यांचे पालक यांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. अन्यथा वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईला सामोरे जावे लागू शकते.**

### नियम तोडणाऱ्या ९० जणांना दिले गुलाबाचे फूल

**पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या संकल्पनेतून गोंदिया शहरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणारे सिग्नल तोडणारे, विरुद्ध दिशेने गाडी चालविणारे अशा ९० जणांना जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे गुलाबपुष्प देत वाहतूक नियम सांगण्यात आले.**

## कार्यालय ग्रामपंचायत पवनी/धाबे
### पंचायत समिती अर्जुनी/मोर,जि.गोंदिया

**निविदा सुचना (पहिली वेळ)**

सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येत आहे की, ग्रामपंचायत पवनी/धाबेला खालील विवरण पत्राप्रमाणे १५ वा वित्त आयोग निधी ग्रामपंचायत लेवल सन २०२२-२३ अंतर्गत बांधकाम करावयाचे असून महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत नोंदणीकृत असलेल्या इच्छुक कंत्राटदारांकडून दिनांक १२/०७/२०२३ दुपारी ३.०० वाजे पर्यंत व्दीलिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहेत. निविदा फार्म प्रक्रियाच्या अनुषंगाने ०५/०७/२०२३ पासून ते दिनांक १२/०७/२०२३ पर्यंत निविदा फार्म विक्री कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात सुरु राहील व दुपारी ३.०० वाजे पर्यंतचे कालावधीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. निविदा बाबतच्या अटी व शर्ती ह्या ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन उपरोक्त वेळेत पहावयास मिळेल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम (रू.लाखात) | निविदा फार्म ची किंमत रू. | अनामत रक्कम (१%) रू. | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Installatio of solar energy based Dual Pump Mini Water Supply Scheme On Existing Borwell/ Durgewell at Pawani/dhabe | 3.50 | 1000 | 3500 | 3 महिने |

**अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. मोहरबंद निविदा ग्रामपंचायतीच्या लगतच्या मासिकसभेत उघडण्यात येतील. सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटिस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.**

**सरपंच** ग्रामपंचायत पवनी/धाबे

**ग्रामसेवक** ग्रामपंचायत पवनी/धाबे

# पूरपरिस्थितीत नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी-जिल्हाधिकारी

**गोंदिया :-** पावसाळा सुरु झालेला असून अशा परिस्थितीत पुरावा धोका संभावत असतो. जिवापेक्षा दुसरे काहीच महत्वाचे नाही, त्यामुळे पूरपरिस्थितीत नागरिकांनी आपल्या जिवाची विशेष काळजी घ्यावी व या दरम्यान कुठल्याही धोकादायक घटनेला बळी पडू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले. नदी किंवा नाल्याला पूर आला असल्यास तो ओलांडू नये असे कळकळीचे आवाहनही त्यांनी केले.

पावसाळ्यात रस्ते खचने, पूल वाहून जाणे, नाल्या चोक होणे अशा घटना घडत असतात. त्यामुळे वाहन चालवितांना विशेष काळजी घेण्यात यावी. पावसाळ्यात रस्त्यावर चिखल येत असतो अशावेळी वाहनांची गती नियंत्रणात ठेवावी असेही ते म्हणाले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्ह्यातील मान्सून व पूरपरिस्थिती बाबत पत्रकार परिषदेत माहिती देतांना ते बोलत होते. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. नुकतेच जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली असून २७ जून रोजी अतिवृष्टीची नोंद करण्यात आली.



या दरम्यान अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पिंपळगाव-अरततोंडी दरम्यान असलेल्या नाल्यावरील पुलावरुन वाहणाऱ्या पुराच्या पाण्यातून अरविंद गणपत ठाकरे अंदाजे वय ५० वर्ष हा इसम वाहून गेला असून दि.२८ जून रोजी जिल्हा शोध व बचाव पथकाद्वारे वाहून गेलेल्या इसमाचे प्रेत बाहेर काढण्यात आले आहे. तसेच २८ जून रोजी तिरोडा तालुक्यातील सरांडी येथे विहिरीत ४ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ४ लोकांच्या मृत्यूचे ठळक कारणे शवविच्छेदन आल्यानंतरच निष्पन्न होईल अशी माहिती जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी दिली.

पूरपरिस्थितीत नदी-नाल्यावरील पुलावरुन पाणी वाहत असतांना कोणतेही वाहन ओलांडू नये शिवाय पायीसुध्दा जाण्याचा प्रयत्न करु नये. सेल्फी घेण्यासाठी मुलांना नदी-नाल्यांच्या पाण्याजवळ जाऊ देऊ नये. शक्यतो विजेच्या उपकरणांचा वापर करु नये. पूरपरिस्थिती दरम्यान स्थलांतर करावे लागल्यास आवश्यक वस्तु बरोबर घ्याव्यात व सुरक्षित रस्त्यांचाच वापर करावा. आपत्ती प्रसंगी नजिकच्या तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन अथवा बचाव दलाशी संपर्क साधावा. जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

## पुर परिस्थीतीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

**पूर परिस्थितीवर मात करणे शक्य आहे. आपत्ती दरम्यान नागरिकांच्या कोणत्याही मदतीसाठी जिल्हा प्रशासन नेहमीच सज्ज आहे. प्रशासन व नागरिक हे समाजातील घटकाचे दोन बाजू आहेत, अशा परिस्थितीत आपत्ती दरम्यान प्रशासन व नागरिकांनी एकमेकांशी समन्वय ठेवून पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी एकत्रित यावे. सद्यस्थितीत धरण, जलाशय इत्यार्दीमध्ये पाण्याची पातळी वाढत असून पाण्याचा विसर्गामुळे नदी काठावरील गावांमध्ये संभाव्य पूर परिस्थितीचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सर्व संबंधित नागरिकांनी विशेष दक्षता घेवून "सजग नागरिक सुरक्षित नागरिक" या सूत्राचे पालन करून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला सहकार्य करावे. तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष- ०७१८२-२३०१९६, ९४०४९९१५९९ (वाट्सॲप) या क्रमांकावर संपर्क करावे.**

## जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन

**सद्यस्थितीत धरण, जलाशय, तलाव, नदी, नाले इत्यार्दीमध्ये पाण्याची पातळी वाढली असून अशा ठिकाणी पाण्याच्या प्रवाहात उतरू नये. तसेच या ठिकाणी सेल्फीचे मोह टाळावे व पाण्यात बोटिंग करतांना लाइफ जॅकेटचा वापर करावा तसेच बोटीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त नागरिकांनी बसू नये. तसेच पुलावरुन पाणी वाहत असताना नागरिकांनी पूल ओलांडण्याचा प्रयत्न करू नये, पाण्यात वाहन टाकू नये. ढगाळ वातावरण किंवा मेघ गर्जना होत असल्यास सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा. धातुजन्य वस्तुच्या जवळ उभे राहू नये. या दरम्यान विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे.**

# अजित पवार पाचव्यांदा बनले राज्याचे उपमुख्यमंत्री, एकाच पंचवार्षिकमध्ये तिसऱ्यांदा उपमुख्यमंत्री पदी

**गोंदिया:-** राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते अजित पवार यांनी पुन्हा एकदा मोठा धक्का देताना आज २ जुर्ले रविवारी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यासोबतच अजित पवार पाचव्यांदा राज्याचे उपमुख्यमंत्री बनले आहे. राज्याच्या राजकारणात सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा त्यांचाच विक्रम त्यांनी मोडला आहे.तर एकाच पंचवार्षिकमध्ये तिसऱ्यांदा उपमुख्यमंत्री पदाचा शपथ घेतली.



अजित पवार यांनी ११ नोव्हेंबर २०१० रोजी सर्वप्रमथ उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. तब्बल १ वर्ष ३१९ दिवस या पदावर राहिल्यानंतर २५ सप्टेंबर २०१२ रोजी त्यांनी या पदाचा राजीनामा दिला होता. तेव्हा पृथ्वीराज चव्हाण राज्याचे मुख्यमंत्री होते.

यानंतर तीनच महिन्यांत पृथ्वीराज चव्हाण यांच्याच नेतृत्वात ७ डिसेंबर २०१२ रोजी अजित पवार यांनी पुन्हा राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तेव्हापासून सरकारचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत ते या पदावर कायम राहिले. एकाच पंचवार्षिकमध्ये दोन वेळा अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

अजित पवार यांनी तिसऱ्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली ती २३ नोव्हेंबर २०१९ रोजी. त्यांचा हा शपथविधी संपूर्ण देशभरात चांगलाच चर्चेत राहिला. सकाळीच घेतलेल्या या शपथेला पहाटेचा शपथविधी म्हणून संबोधले गेले. देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या नेतृत्वात तीन दिवसांसाठी अजित पवार हे उपमुख्यमंत्री राहिले. त्यानंतर राष्ट्रवादीच्या आमदारांनी महाविकास आघाडी सरकारला पाठिंबा दर्शवल्याने अजित पवार यांचे हे बंड तीनच दिवसांत फोल ठरले.

देवेंद्र फडणवीसांसोबत पहाटेच्या शपथविधीचा प्रयोग फसल्यानंतर अजित पवारही पुन्हा महाविकास आघाडीसोबत आले आणि पुन्हा उपमुख्यमंत्रीपदाची माळ त्यांच्या गळ्यात पडली. ३० डिसेंबर २०१९ रोजी अजित पवार यांनी चौथ्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्रीपद भूषवले. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर महाविकास आघाडी सरकार कोसळेपर्यंत २ वर्षे १८१ दिवसांसाठी ते या पदावर कायम राहिले.

आता पुन्हा एकदा अजित पवार यांनी आज म्हणजेच २ जुलै २०२३ रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. ते पाचव्यांदा या पदावर विराजमान झाले आहे. विशेष म्हणजे एकाच पंचवार्षिकमधील हे त्यांचे तिसरे उपमुख्यमंत्रीपद आहे.

# सहा वर्षानंतर मुरकुटडोहच्या शाळेत मुलांचा किलबिलाट

**गोंदिया:-** जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर बसलेल्या अतीदुर्गम नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळखले जाणारे मुरकुटडोह दंडारी येथील २०१६ पासून बंद असलेली प्राथमिक शाळा तब्बल सहा वर्षानंतर ३० जून रोजी उघडली गेल्याने २२ विद्यार्थ्यांचा किलबिलाट गजबजला. नव्या शैक्षणिक सत्राच्या पहिल्या दिवशी शाळाप्रवेशोत्सोव कार्यक्रम जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले, उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती यशवंत गणवीर,पंचायत समिती सभापती प्रमीलाताई गणवीर, जि.प.सदस्या छायाताई नागपूरे, गीताताई लिल्हारे, विमलताई कटरे,वंदना काळे, जि.प.सदस्य हनवंत वट्टी,पंचायत समिती सदस्य अर्चना मडावी, नितेश वालदे, सुनिता राऊत,रेखा फुंडे, सरपंच जमनाताई मरकाम ,प.स.सदस्य जुमानसिंग उपराडे,माजी नगराध्यक्ष विरेंद्र उईके, सुनीताताई राऊत, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ महेंद्र गजभिये, गटशिक्षणाधिकारी विशाल डोंगरे, अदानी फाऊंडेशनचे बिमुल पटेल,राहुल सेजाव,ग्रामपंचायत सदस्य,नागरीक व पालक उपस्थित होते.शाळाप्रवेश विद्यार्थ्यांना अदानी फाऊंडेशनच्यावतीने स्कुलबँगचे वितरण करण्यात आले.



सन २०१६ पासून येथील शाळा कमी पटसंख्येमुळे बंद संख्येमुळे शाळा बंद करण्याचा निर्णय तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी घेतला होता. ती शाळा पुर्ववत सुरु व्हावी अशी ग्रामस्थांची मागणी व भूमिका बेरार टाईम्सने सातत्याने मांडली होती.गेल्या मे महिन्यात सुध्दा प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते.त्यानंतर गटशिक्षणाधिकारी सालेकसा व जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी मुरकुटडोह येथे भेट देत ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेतले.त्यानंतर शिक्षण सभापती व जि.प.अध्यक्षांना सदर शाळा सुरु करण्यासंदर्भातील ग्रामस्थांची भूमिका सांगितल्यानंतर या शैक्षणिक सत्रापासून शाळा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि ३० जून रोजी बालकांचा किलबिलाट पुन्हा सुरु झाला.

# ओबीसीच्या न्यायासाठी लोकसंख्या निहाय आरक्षित मतदार संघ आवश्यक



**आयएसी अध्यक्ष हेमंत पाटील यांची मागणी**

**मुंबई:** राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींची संख्या २० टक्क्यांच्या घरात आहे. मागासवर्गीयांना योग्य राजकीय प्रतिनिधित्व देण्यासाठी त्यांच्यासाठी राखीव मतदार संघ ठेवण्यात आले आहेत. याचधर्तीवर इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) देखील लोकसंख्येच्या आधारे राखीव मतदार संघ ठेवण्याची काळाजी गरज आहे, असे प्रतिपादन इंडिया अगेन्स्ट करप्शनचे (आयएसी) राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी शनिवारी केले. निवृत्त न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांच्या आयोगाने सादर केलेल्या अहवालानूसार राज्यात ३८% ओबीसी आहेत. या लोकसंख्येला आधार मानत राज्यात किमान ६५ विधानसभा मतदार संघ ओबीसींसाठी राखीव ठेवण्यात आल्यानंतरच ओबीसींना योग्य राजकीय प्रतिनिधित्व मिळेल, असा दावा पाटील यांनी केला.

राज्याच्या निर्मितीपासून आतापर्यंत महाराष्ट्रात जवळपास ५४ विधानसभा मतदार संघात एकही मराठेतर आमदार निवडून आलेला नाही. एकप्रकारे मराठा समाजासाठी कायम राखीव असल्यासारखेच हे मतदार संघ आहेत.राज्यात एससी, एससटीसाठी ४८ मतदारसंघ राखीव आहेत.मराठा समाजाची लोकसंख्या त्यांच्यापेक्षा कमी असून देखील ५४ आणि इतर मतदारसंघात निवडून येणारे मराठा आमदार मिळून १२६ ते १४० मराठा आमदार दरवेळी निवडून येतात.ही टक्केवारी खुल्या जागांच्या ५५ टक्क्यांपर्यंत आहे,असे पाटील म्हणाले.

एवढ्या मोठ्याप्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व असून देखील मराठा समाजाकडून सामाजिक, शैक्षणिक आरक्षणाची मागणी का केली जात आहे? इतर मागासवगीयांमध्ये मराठा समाजाला समाविष्ट करणे ओबीसींवर अन्यायकारक नाही का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. काकासाहेब कालेलकर आयोग, मंडल आयोग, मराठा सरेकरी अहवाल,आरमारी मराठा अहवाल,मराठा अक्करमाशी अहवाल, साळू अथवा पुरोगामी मराठा अहवाल, सर्व मराठा समाज अहवाल, वायंदेशी मराठा अहवाल या आठही अहवालांमध्ये मराठ्यांना ओबीसीमध्ये समाविष्ठ करण्यास नकार देण्यात आला. बापट आयोगानेही या विषयाचा सांगोपांग अभ्यास करून असे करण्यास नकार दिला.

केंद्रीय मागासवर्ग आयोगानेही मराठ्यांना ओबीसी दर्जा नाकारला. अशा परिस्थितीत आता अकराव्यांदा राज्य आयोगाकडे पाठविण्याची घोषणा करण्यात आली आहे. आयोगापुढे एकही प्रकरण परत पाठविण्यात आले नाही. मग आताच सरकार बेकायदेशीरपणे ही कृती का करीत आहे. आयोग आधीच्या आयोगाची फेरतपासणी करू शकत नाही, त्यामुळे शासनाचा हा निर्णय अवैध आहे असा दावा पाटील यांनी केला.

# शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना गोंदिया जिल्हाध्यक्षपदी टेकराम बिसेन यांची निवड

**गोंदिया:-** शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना गोंदिया जिल्ह्याच्या जिल्हा कार्यकारीणीकरीता झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाचे जलसंधारण अधिकारी टेकराम नारायण बिसेन यांची बिनविरोध निवड झाली.

निवडणुक अधिकारी पारखदास पटले यांनी ही घोषणा केली. सोबतच उपाध्यक्षपदी लिलाधर कापगते (तलाठी तहसिल कार्यालय देवरी), सचिव गिरिधर सोनवाणे (तलाठी तहसील कार्यालय गोंदिया), सहसचिव रमेश रहांगडाले (वरिष्ठ लिपिक लघु पाटबंधारे विभाग गोंदिया) व कोषाध्यक्ष पदावर नाभिकमल चौधरी (तलाठी, तहसील कार्यालय गोरेगाव) यांचीही बिनविरोध निवड झाली आहे.

# हेल्मेट वापरासाठी जनजागृती करा-खा.अशोक नेते



**गोंदिया :-** रस्त्यावरील अपघातामध्ये दुचाकी अपघाताचे प्रमाण अधिक आहे. अपघात नियंत्रणात आणण्यासाठी नागरिकांनी दुचाकी चालवितांना हेल्मेटचा वापर करणे आवश्यक आहे. दुचाकीवरून प्रवास करतांना नागरिकांनी हेल्मेट वापरावे, यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात यावी अशी सूचना समिती अध्यक्ष खासदार अशोक नेते यांनी केली.

संसद सदस्य रस्ता सुरक्षा समितीची बैठक खासदार अशोक नेते यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, खासदार सुनील मेंढे, आमदार विनोद अग्रवाल, जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे, पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा जयेश भांडारकर नगरपरिषद मुख्याधिकारी करण चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

हेल्मेट वापरासाठी जनजागृती करण्यासाठी अशोक नेते यांच्या हस्ते हेल्मेट वाटपाचा कार्यक्रम देखील घेण्यात आला. जिल्ह्यातील अपघातांचा तपशीलवार आढावा या बैठकीत घेण्यात आला. तसेच ब्लॅकस्पॉट व अपघातप्रवण स्थळांचा आढावा घेण्यात येऊन त्यावर उचित उपाययोजना करण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी वाहनचालकांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या वाहन चालकांवर विशेष मोहीम राबवून कारवाई करणेबाबत सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे यांनी सादरीकरण केले. यावेळी विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# क्रीडा संकुलला 'एकलव्य क्रीडा संकुल' असे नाव द्या-नगर विकास आघाडीची मागणी

**सालेकसा:** येथील तालुकास्तरीय क्रीडा संकुलाचे बांधकाम होऊन वर्ष लोटले तरीही उद्घाटन अभावीच संकुल सुरू करण्यात आले. त्यामुळे अद्याप क्रिया संकुलाला कोणतेही नाव देण्यात आले नाही. शिवाय राजकारणाच्या पेचात फसून अद्याप उद्घाटन न झाल्याने अजूनही तालुका क्रीडा अधिकाऱ्याची सुद्धा नेमणूक झालेले नसल्याने पद रिक्त आहे. स्पर्धा परीक्षा व शारीरिक चाचणीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसला आहे.

नगर विकास आघाडी सालेकसाच्या वतीने सदर क्रीडा संकुल आला मएकलव्य क्रीडा संकुलफ असे नाव देण्यात यावे अशी मागणी करण्यात आलेली आहे. सालेकसा तालुका आदिवासी बहूल असून आदिवासी संस्कृतीने व्यापलेला आहे. तालुक्यात आदिवासी संस्कृती आणि कलेचा वाव असून यामुळेच तालुक्याला एक वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. त्यासाठी आदिवासी समाजाचे प्रेरणास्थान असलेले एकलव्य यांच्या कार्याला प्रेरित होऊन तालुका क्रीडा संकुलाला एकलव्य क्रीडा संकुल असे नाव योग्य असणार असे निवेदनातून स्पष्ट केलेले आहे.

यासोबतच क्रीडा संकुलात कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानधन अनियमित असल्याने कर्मचाऱ्यांना आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागते. यावर उपाय म्हणून डीबीटी च्या माध्यमाने दरमहा मानधन अदा करण्यात यावे अशीही मागणीचे निवेदन प्रभारी तालुका क्रीडा अधिकारी व तहसीलदार असलेले नरसय्या कोंडगुरले यांना देण्यात आले.




यावेळी नगर विकास आघाडीचे समन्वयक मनोज डोये, राहुल हटवार, रोहित बनोठे, विनोद वैद्य, गुणीलाल राऊत, कैलाश गजभिये, विनोद मडावी, गोल्डी भाटिया, यशवंत शेंडे, उमंग बनसोड, स्वप्निल करवाडे व अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

# ओबीसी विद्यार्थ्यांच्या ७२ वसतीगृह व स्वाधार योजनेचे काय झाले?

## आमदार अग्रवाल, रहांगडाले, कोरेटेंना ओबीसींचे निवेदन



**गोंदिया:-** येत्या १७ जुलैपासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात,इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत(ओबीसी) इतर मागास प्रवर्ग,भटके विमुक्त आणि विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहे व २१६०० विद्यार्थ्यासाठी स्वाधार योजना सुरु करण्याच्या मुद्याला घेऊन सरकारला प्रश्न विचारण्यात यावे,याकरीता आज रविवारला ओबीसी अधिकार मंचसह ओबीसी विविध संघटनाच्यावतीने गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात त दहावी,बारावीचे निकाल घोषित होवून जवळपास एक महिना उलटला आहे. इतर अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांप्रमाणे ग्रामीण भागातील इतर मागास,भटके विमुक्त,विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सुद्धा उच्च शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी यावे लागते.परंतु शहरात वास्तव्याची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना हलाकिचा सामना करावा लागतो आणि अनेक विद्यार्थी गरिबीमुळे शहरात येवूच शकत नाही. यास्तव इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात.ग्रामीण इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृहे व अनुसूचित जातीच्या धर्तीवर स्वाधार योजना ओबीसी विद्यार्थ्यांना लागू व्हावी तसेच वसतीगृह तातडीने सुरु करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी आमदार अग्रवाल यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करतांना ओबीसींच्या वसतीगृह व स्वाधार योजनेवर आपण सरकारला प्रश्न विचारण्याचे आश्वासन देत गोंदियात शासकीय जागा वसतीगृहाकरीता उपलब्ध करुन देण्यासाठी पाठपुरावा सुरु असल्याचे सांगितले.तसेच ओबीसी शिष्टमंडळाने गोंदियातील केंद्रीय विद्यालयाला जागा हवी असून या विद्यालयातून सर्वसामान्य नागरिकांच्या मुलांना चांगले शिक्षण उपलब्ध होऊ शकते असे सांगितल्यावर केंद्रीय विद्यालयासाठी सुध्दा जागा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले.



निवेदनात इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १०० मुले, व १०० मुली या मर्यादेत प्रतिजिल्हा २००याप्रमाणे ३६ जिल्ह्यांसाठी एकूण जिल्हानिहाय दोन याप्रमाणे ७२ वसतिगृहे कार्यान्वित करण्यास दि.२८.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तसेच जिल्हानिहाय वसतिगृहे सुरू करण्याबाबत मार्गदर्शन सूचना व नियमावली निश्चित करण्यासंबंधीने १३ मार्च २०२३ रोजी शासन परिपत्रक क्रमांक: वगृयो - २०२३/प्र.क्र.१२/योजना - ५ याद्वारे प्रशासनास सूचना देण्यात आल्या होत्या. सोबतच अनुसूचित जातीच्या धतीवर ईतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना स्वाधार योजना लागू करण्यात येईल अशी घोषणा नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात २९.१२.२०२२० रोजी, उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री देवेद्र फडणवीस यांनी केली होती.परंतु अद्यापही त्यावर निर्णय न झाल्याने ओबीसी समाजात रोष असल्याचे म्हटले गेले.



आमदार अग्रवाल यांना निवेदन देतेवेळी ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे, ओबीसी सेवा संघ प्रदेश उपाध्यक्ष सावन कटरे, सर्वसमाज संघटनेचे तिर्थराज उके, एस.यु.वंजारी, ओबीसी संघर्ष समितीचे कैलास भेलावे, युवा बहुजन संघटनेचे सुनिल भोंगाडे, अधिकारी कर्मचारी महांसघाचे मार्गदर्शक हरीराम येळणे, ओबीसी सेवा संघाचे जिल्हा महासचिव पी.डी.चव्हाण, तालुका अध्यक्ष प्रमोदकुमार बघेले, सी.पी.बिसेन, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पप्पू पटले, उमेशकुमार कटरे, सुरेंद्र गौतम, सरिता येळणे, वैशाली बघेले, डी.आय.खोब्रागडे,आर.जी.वैद्य आर्दी उपस्थित होते.

तिरोडा येथे आमदार विजय रहांगडाले यांना ओबीसी महासंघाच्यावतीने निवेदन देण्यात आले. यावेळी वाय.टी.कटरे, मेघा बिसेन,डी.एच.चौधरी, ए.डी.शरणागत, एन.एच.शरणगत, डी.डी. रिनायत, खुशल ढोमणे, राजू गाडवे, रविकिरन ढोरे उपस्थित होते. तर देवरी येथे आमदार सहषराम कोरोटे यांना कृष्णा बहेकार यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले.